# गीतवैजयंती



म. ग्रं. सं. ठाणे
REFBK-0005371

ठाणें मराठी ग्रंथसंग्रहालय या संस्थेस

श्री शारदा प्रसन्न नजर.

ग्रंथकर्ती
ता. ७।६।३५

# गीतवैजयंती

प्र. क्र. ६३५७.

अगदीं नवीन रचलेलें, आटोपसर व सुंदर

'सतिसावित्री चरित्र'

'गिरिबाला'

व

स्त्रिया व मुली यांस उपयुक्त अशा

भक्तिपर पद्यांचा समुच्चय.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें
स्थळ प्रत
सं.क्रं. ७०७५ नं. ११२३
ता. १३।५।३५
ठाणें.

REFBK-0005371
REFBK-0005371

— कवयित्री —

## सावित्रीबाई पाटणकर

शके १८५७] ठाणें [सन १९३५

किंमत ८ आणे.

प्रकाशकः—
सावित्रीबाई पाटणकर
ठाणें.

—सर्व हक्क कवियित्रीचे स्वाधीन—

मुद्रकः—
के. पी. पिळगांवकर,
मन्वन्तर छापखाना, १०० डी.
पाध्ये (वाडेकर) बिल्डिंग,
गिरगांव-मुंबई ४.

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं. ........ नं. ........
ता. ........

# हकीकत

काय म्यां पामरें बोलावीं उत्तरें । परी त्या विश्वंभरें बोलविलें ॥

—तुकाराम

मी कांहीं कवियित्री किंवा लेखिका नसून माझें शिक्षणहि लिहिण्या-वाचण्या पुरतेंच झालेलें आहे. असें असूनहि मी जीं चारदोन वेडीं वांकडीं पदें महिलावर्गासाठीं रचूं शकलें याचें सर्व श्रेय माझ्या परमपूज्य माता-पित्यांनीं लहानपणीं धार्मिक शिक्षणाचे जे घुटके पाजले त्यांजकडेच आहे हें कबूल करण्यास मला अतिशय अभिमान वाटतो.

माझे वडील कै. शिवरामपंत ऊर्फ बाबासाहेब नातू बुधगांव संस्थानांत श्रीमंत सरदार माधवराव ऊर्फ बाबासाहेब पटवर्धन ह्यांच्याकडे नोकरीस होते. ते अतिशय परोपकारी, मनमिळाऊ व सुस्वभावी होते. माझा जन्म १८८५ सालीं कर्नाटकांत रामदुर्ग येथें झाला व माझें बालपण बिऱ्हाड सिद्धाचें कवठें ह्या गांवीं गेलें. त्या काळीं स्त्रीशिक्षणाचा विशेष प्रसार नसल्या-मुळें वडिलांनीं मला शाळेंत न घालतां घरच्या घरींच लिहिण्या-वाचण्यास शिकविलें व धार्मिक शिक्षणहि दिलें. माझ्या पतीची जोड अल्पच होती; पण ती उत्तम असल्यामुळें माझी स्वधर्मबुद्धि चांगली राहिली.

फक्त स्त्रियांकरितांच व स्त्रियांनींच लिहिलेलीं गाण्यांचीं पुस्तकें फारच थोडीं आहेत व त्यांतील गाणीं सुबोध नसतात व गाण्यांच्या चालीहि जुन्याच असतात. स्त्रियांस प्रसंगानुरूप म्हणावयाचीं गाणीं – सावित्री आख्यानाचें, डोहाळजेवणाचें वगैरे वगैरे – अत्यंत पाल्हाळीक असल्याचीं माझ्या अनुभवास आलीं व आपण त्याबाबत कांहींतरी करावें असें सारखें वाटत होतें. त्या वाटण्याचेंच रूपांतर नंतर कृतींत झालें. परंतु आपण अशिक्षित, आपल्या गाण्यांकडे कोणी लक्ष्य देणार नाहींत, लक्ष्य दिलें तरी त्यांस नांवें ठेवण्यापली-कडे कोणी कांहीं करणार नाहींत असें वाटत होतें. त्यामुळें बरेच दिवस तीं तशींच पडून राहिलीं होतीं. तीं जर माझ्या कांहीं सुशिक्षित स्त्री व पुरुष मित्रांच्या नजरेस पडलीं नसतीं व त्यांनीं जर मला तीं प्रसिद्ध

करण्याबद्दल आग्रह केला नसता तर तीं काळाच्या तडाख्यांत सांपडून जनतेच्या नजरेस न येतां तशींच विलयास गेलीं असतीं. माझ्या मित्रांच्या प्रोत्साहनानेंच मी तीं प्रसिद्ध करण्याचें धाडस करीत आहें. माझी कृती जरी अगोड व नीरस अशी असली तरी महिलावर्ग तीं आपुलकीच्या भावनेनें गोड करून घेईल ही दृढ आशाहि ह्या धाडसाच्या मुळाशीं आहेच. भरतभूमींत जीं प्रसिद्ध स्त्रीरत्नें होऊन गेलीं त्यांपैकीं सावित्री ही होती. ती महान् पतिव्रता व तेजस्वी होती. दृढनिश्चयाच्या जोरावर तिनें यमाला युक्तिवादानें जिंकून पतीचे प्राण परत आणले. प्रत्येक हिंदु स्त्रीस तिची माहिती असते. तेव्हां तिच्याविषयीं जास्त माहिती देण्याची जरूरी नाहीं. प्रत्येक आर्य ललनेनें तिचें चरित्र सतत आपल्या समोर आदर्श म्हणून ठेवावें अशी माझी विनंति आहे.

सदर गाण्यांपैकीं बरींचशीं गाणीं, विशेषतः वटसावित्री आख्यानाचें गाणें माझी सून सौ. इंदिराबाई पाटणकर आज गेलीं दोन वर्षें महिलासमाजांत आपल्या सुस्वर आवाजानें म्हणत आहे व तीं त्यांस आवडल्याचें प्रत्यास येत आहे ही गोष्ट येथें नमूद करणें अप्रस्तुत होणार नाहीं असें वाटल्यावरून नमूद करीत आहें.

आभार मानण्याचें गोड कर्तव्य करून माझें हें लांबलेलें हृद्गत पुरें करतें. रा. रा. मेघश्याम गणेश साठे ह्यांनीं सदर पुस्तकाचें हस्तलिखित सुंदर अक्षरांत मजकरितां रात्रंदिवस मेहनत घेऊन तयार करून दिल्याबद्दल त्यांचे, मुंबईच्या सुप्रसिद्ध विदुषी सौ. अवंतिकाबाई गोखले ह्यांनीं त्यांची माझी विशेष ओळख नसतांनाहि पुस्तकाचा योग्य पुरस्कार केल्याबद्दल त्यांचे व बदलापुरचे रिटायर्ड सबजज्ज रा. रा. नानासाहेब चापेकर ह्यांनीं त्यांस वेळ नसतांनाहि हस्तलिखित वाचून त्यावर अभिप्राय दिला ह्याबद्दल त्यांचे — ह्यां सर्वांचे व मला वेळोंवेळीं मदत करून उपकृत केल्याबद्दल इतर मित्रांचे आभार मानणें मी माझें कर्तव्य समजतें.

**सावित्रीबाई पाटणकर**
**( ऊर्फ गोदूबाई नातु )**

# थोरांचे आशीर्वाद

-(१)-

श्रीमती सावित्रीबाई पाटणकर ह्यांनीं रचलेल्या कविता, गाणीं, पदें, आरत्या वगैरे मला त्यांच्यातर्फे श्री. मे. ग. साठे ह्यांनीं वाचून व गाऊन दाखविल्या. सावित्रीबाईंचें लिहितां-वाचतां येण्यापलीकडे शिक्षण नसतांहि निरनिराळ्या चालींत त्यांनीं केलेली रचना पाहून आश्चर्य वाटलें.

या संग्रहांत 'नौका' 'तान्हुला मजवरी रुसला' 'कामधेनु' 'श्यामसुंदर' 'वडील बंधूस पत्र' हीं काव्यें मनोवेधक आहेत. कवियित्रीमध्यें कल्पनाशक्ति नाहीं असें नाहीं. करुणरस चांगला उतरला आहे. श्यामसुंदराची भाषा चांगली आहे. बाईंचें सावित्री आख्यान स्त्रियांना फारच उपयुक्त वाटेल, कारण तें सध्यां प्रचलित असलेल्या आख्यानांपेक्षां आटोपसर आहे. या संग्रहांतील पदें आरत्या वगैरे पाठ करून रोज म्हणण्याचा प्रघात ठेवल्यास त्यांचें मन प्रसन्न झाल्यावांचून राहणार नाहीं असा मला भरंवसा वाटतो. शाळांतून मुलींना बक्षिस देण्यास हें पुस्तक सर्वथैव योग्य आहे.

**ना. गो. चाफेकर**, रिटायर्ड सबजज्ज.

-(२)-

श्री. सावित्रीबाईंनीं आपण लिहिलेल्या कविता पदें वगैरे माझ्याकडे वाचावयास आणून दिल्या. त्यांपैकीं मीं कांहीं वाचून पाहिल्या. मला स्वतःला काव्य समजत नाहीं, तरी देखील सावित्री आख्यान, संदेश वगैरे वाचून फार आनंद वाटला. सावित्रीबाईंचें शिक्षण केवळ लिहितां-वाचतां येण्यापुरतेंच आहे, तरी देखील त्या इतकें सुंदर काव्य निर्माण करूं शकतात, यावरून ही गोष्ट सिद्ध होते कीं, त्यांचें काव्य स्वयंस्फूर्तीचें आहे. त्यांच्या कवनांमध्यें भक्तिरसाबरोबर इतर उच्च भावनाहि भरलेल्या आहेत. त्यांचीं कवनें सर्व स्त्रियांना वाचण्यालायक आहेत. तरी भगिनीवर्गानें यांचा लाभ घ्यावा असें मी इच्छितें.

श्री. सावित्रीबाई सारखीं रत्नें हिंदुस्थानांत परिस्थितीमुळें लपलेलीं आहेत. त्यांना उजेडांत आणावयाचें श्रेय भगिनींनीं घ्यावें अशी माझी अंतः-करणपूर्वक इच्छा आहे.

सौ. **अवंतिकाबाई गोखले.**
अध्यक्ष 'हिंद महिला समाज' **मुंबई.**

–(३)–

वास्तविक पाहतां रा. रा. ना. गो. चाफेकर, सौ. अवंतिकाबाई गोखले यांच्या सारख्या विद्वज्जनांनीं आपले अभिप्राय दिल्यावर माझ्या सारख्याच्या अभिप्रायाची कांहीं जरूरी नव्हती. पण बाईंचा फारच आग्रह पडल्यामुळें दोन शब्द लिहिणें मला प्राप्त झालें.

त्यांनीं मला प्रथम आपलें बाड आणून दाखविलें तेव्हां तें कांहीं तरी चऱ्हाट असेल असें वाटलें, पण वाचून पाहतां असें आढळून आलें कीं त्यांतील कांहीं कांहीं कविता फारच उत्कृष्ट आहेत. पुष्कळ पदांतून ठराविक सांच्याचीं वर्णनें जरी आहेत तरी मधून मधून भावनादर्शनहि यथायोग्य झालें आहे. लिहिण्या-वाचण्या पलीकडे त्यांचें शिक्षण गेलें नसून मोठे मोठे शब्द व आपले विचार प्रदर्शित करण्याची त्यांची हातोटी पाहून मला फारच आश्चर्य वाटलें. आणि म्हणूनच तें सर्व तपासण्याचें काम मीं स्वखुशीनें पत्करलें.

'वडील भावास पत्र' या कवितेंत त्यांनीं आपल्या मनांत येणाऱ्या सर्व भावना एकाद्या मोठ्या कवीप्रमाणें दर्शित केल्या आहेत. नौका, तान्हुला मजवरी रुसला, इत्यादि कविताहि बऱ्या आहेत. पदांच्या चाली निरनिराळ्या व मधुर असल्यामुळें भगिनीवर्गाला फारच आवडतील यांत संशय नाहीं. 'सावित्री' व 'गिरिबाला' हीं दोन आख्यानें थोड्या वेळांत म्हणतां येण्या-जोगीं केल्यामुळें तीं आख्यानें ऐकण्यास पूर्वीप्रमाणें ताटकळत तासन् तास बसावें लागणार नाहीं. एकंदरींत पुस्तक प्रत्येक आर्य स्त्रीनें आपल्या संग्रहीं ठेवण्यालायख झालें आहे याबद्दल माझी पूर्ण खात्री आहे.

**मेघश्याम गणेश साठे,** बी. ए.
ता. १-११-१९३५.

-( ४ )-

श्री. सावित्रीबाई पाटणकर यानीं लिहिलेलीं पदें कविता व सावित्री-हरतालिका आख्यानें वाचून व ऐकून मनास आल्हाद तर वाटतोच पण इतक्या प्रौढ वयांत तुटपुंज्या शिक्षणावर – बिकट परिस्थितींतूनहि नेटानें मार्ग काढीत असतांना आपल्या तीव्र स्मरणशक्तीच्या जोरावर इतक्या चिकाटीनें – परिश्रमानें – इतकें सुंदर काव्य निर्माण केलें याबद्दल त्यांच्या बद्दलचा आदर व प्रेम द्विगुणीत होतें यांत शंका नाहीं. आणि धार्मिक शिक्षणाच्या जोरावर सुद्धां स्त्रियांना किती कार्य करतां येतें याचा उत्तम धडा त्यांनीं भगिनीवर्गास घालून दिला आहे तेव्हां याबद्दल त्यांचें अभिनंदन करावें तितकें थोडेंच होईल.

यम-सावित्रीचा संवाद, पतिनिष्ठा व सासुसासऱ्यांची सेवा वगैरे योग्य वेळेला दाखवलें आहे. हें स्त्रियांना लक्षांत ठेवण्याजोगें आहे.

**योगिनी गोखले.**

# पुण्यस्मरण

प्रारब्धयोग न कधीं टळला कुणाला ।
भालीं मला तव वियोग म्हणोनि आला ॥
अज्ञान, मी बहु वृथा तयिं शोक केला ।
आणोनि बोधवच मन्मनिं तोष झाला ॥ १ ॥

बुधगांव शोभे अभिधान ज्यातें ।
आयुष्य कण्ठून सुखांत जेथें ॥
अप्रीय कोणा नच थोर कीर्ती !
अद्याप तेथें जनलोक गाती ॥ २ ॥

सौख्यांत ऐसे दिन घालवीले ।
वृद्धापकालीं स्वगृहासिं आले ॥
चालावया नांव सुपुत्र दोघे ।
भाग्यश्री भोगीत सदैव मागें ॥ ३ ॥

स्वर्गीं मिळे शांति जयें तुम्हांला ।
करीन लोकोत्तर सत्कृतीला ॥
स्तवीन धेनूस्तव लोक सारा ।
स्वदेशकाजाहि, नको पसारा ॥ ४ ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थल क्र.
सं.
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
द्रा. क्र.

# गीतवैजयंती

## भाग पहिला

# अनुक्रमणिका

## भाग पहिला

१ गणपतिस्तवन
२ शारदास्तवन
३ सद्गुरुस्तवन
४ सती सावित्री
५ सावित्रीची आरती



# समर्पण

माझे परमपूज्य तीर्थरूप

**रा. रा. शिवराम त्रिंबक**

ऊर्फ

**बाबा नातू**

यांचे चरणीं

हें ' सत्याग्रही सती सावित्री ' चें चरित्र

व इतर कवनें प्रेमादरयुक्त

अंतःकरणानें अर्पण

करीत आहें.

—सावित्रीबाई पाटणकर.

# गीतवैजयंती

[भाग पहिला]

५३५७
मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं. ९१०५ नं. ११८३
ता. ९३।५।३५
ठाणें.

## १. गणपतिस्तवन

( चाल—**श्याम चुनरिया दे दे मोरी** )

या शिवसुता शरण जाऊं । हरिल संकटा मंगलमूर्ती । ध्याऊं, गाऊं, सुमना वाहूं ॥ धृ० ॥ ध्यान करूं हें गजवदनाचें । निशिदिनिं गाऊं नाम तयाचें । स्तवन करूं या गौरीसुताचें ॥ १ ॥ रूप तुझें हें भव्यहि सुंदर । शूर्पकर्ण हे विशाल उदर । कासें कसिला दिव्य पितांबर ॥ २ ॥ कुंतल कुरळे शिरीं शोभती । श्रवणिं कुंडलें झगमग करिती । वांकीं नूपुरें झणत्कारिती ॥ ३ ॥ तिलक केशरी भाळिं रेखिला । दूर्वांची बहु आवड त्याला । लाडू मोदक नैवेद्याला ॥ ४ ॥ षड्रिपु मम हे नेई विलया । भवनदिमधिं बुडते **शिवतनया** । मंगलमूर्ती तारीं सदया ॥ ५ ॥

---

## २. शारदास्तवन

( चाल— **चला सख्यांनो करविर क्षेत्रीं** )

वेदजननी तूं परम मंगले । आद्य देवते । कूलदेवते । दीन चरणीं लीन होउनी तुजला वंदिते ॥ धृ० ॥ मूळारंभा हेरंबाची अर्धांगी होसी । अर्धांगी असमी । ब्रह्मकुमारी म्हणती तुजला तारक जगतासी ॥ १ ॥ कृष्णकथामृत गोड निरूपण चाले भागवतीं । व्यासमुखीं स्त्रवती । जिव्हाग्रीं तूं वससि जयाच्या अखंड प्राशीती ॥ २ ॥ विद्यादानीं महामंगला सकला भूषविसी । आर्या भूषविसी । इच्छामात्रें ब्रह्मांडाची घडामोड करिसी ॥ ३ ॥ मयुरवाहना किरीट मस्तकीं । कुंकुम रेखियले । कमल करीं धरिलें । सरस्वती मज प्रसन्न होईं **शिवतनया** बोले ॥ ४ ॥

---

## ३. सद्‌गुरुस्तवन

( चाल— **अरसिक किति हा शेला.** )

जय जय सद्गुरुमाते । हिन दीन बालक नमि चरणांतें ॥ धृ० ॥
तव सेवा दुर्लभ मजला । हीच खंति वाटे मम चित्ताला ॥ १ ॥
मी वत्स मृगि तूंच होसी । सद्बोध चारा मुखिं घालीसी ॥ २ ॥
कामक्रोधें नागविलें । अहंकारसर्पें मज डंखियेलें ॥ ३ ॥
गुरुराज धांवोनी यावें । ज्ञानें हें अज्ञान विष उतरावें ॥ ४ ॥
आज्ञेचा निशिदीनीं भंग । याच दोषें ना भेटे श्रीरंग ॥ ५ ॥
**शिवकन्या** अपराधराशी । नूपेक्षीं सदया दावि पदासी ॥ ६ ॥

---

## ४. सती सावित्री

( चालः—विदर्भकन्या रंगिं पातली— )

नमन करोनी प्रथम गणेशा मानसपूजा अर्पीतें
चरित गावया सावित्रीचें विमलमती द्या प्रार्थीतें
त्रैलोक्यांतचि होउनि गेली सावित्री सति पतिव्रता
सप्तजन्मिचीं पापें हरिती त्या साध्वीचे गुण गातां
गजवदनाचें स्तवन करोनी विधितनयेसी विनवीतें
**शिवतनया** ही मूढ असे तरि साह्य करीं मम गुरुमाते
शाल्वदेशिंचा द्युमत्सेन हा असे नृपति तो बहु शूर
गुणसंपन्ना राज्ञी त्याची पतिव्रताही अति थोर
सुप्रसन्ना गर्भयुक्त ती मंचकिं बसुनी करि चिंता
शाल्वपती तिज म्हणे—"सुंदरी इच्छा वद मज तव आतां"
"राज्यभोग हे मज नावडती वनीं चलावें प्राणपती
डोहाळे मज ऐसे होती, नकळे होइल कोण गती"
विधिघटना ही अघटित घडवी हंसवी रडवी मनुजाला
शत्रु येउनि राज्य जिंकिती, भूपति वनवासी झाला
राज्यहि गेलें, नयनहि गेले, शाल्वपती हे वनिं आले
गर्भवती स्त्री संगें घेउनि गंगासागरिं राहियले
द्राक्ष, आम्रफल, अननस, लिंबें, कदलीं, पात्रीं वाढियलीं
ऋषिपत्न्यांनीं हौस पुरविली, सुंदर पुष्पें गुंफियलीं

पर्णाश्रमिं ती प्रसूत होउनि पुत्ररत्न हें देखियलें
पुत्रावण हें करी शाल्वपति, अल्पायुषि हा ऋषि बोले
नानापरिंच्या फलपुष्पांनीं ऋषी तपस्वी पूजियले
भोजन तांबुल अर्पण करुनी, आशीर्वचना मिळवीलें
शांतिपाठ हे करिती ब्राह्मण जिवती सटवीसी पुजिलें
सतीप्रभावें उठे राजसुत भाळीं अक्षर हें लिहिलें
अकराव्या दिनिं स्नान करोनी शुभ्रवस्त्र हो ती ल्याली
बळीराज तो पूजुनि अंगणिं सूर्यदर्शना ती आली
न्हाणी बुजवुनि मान सुइणिचा कंद फलेंही बहु देती
पुष्पवेलिचा पालख विणला, कोकिळ गुंजारव करिती
सटी बारसें करिति सुवासिनी नांव सत्यवान् ठेवियलें
वनपुष्पांच्या बहूभूषणें बालतनूला सजवीलें
तृतीय वर्षीं चौल जाहलें, खेळे नृपसुत मुदित वनीं
अष्टावर्षीं मौंजीबंधन होउनि वाढत दीनमणी
चरित सत्यवंताचें कथिलें, सावित्रीचें निवेदितें
भावभक्तिनें श्रवण करावें, कर जोडुनियां विनवीतें
पुत्रेच्छेनें यज्ञ करावा मद्रपतीच्या मनिं आलें
हेमनांगरीं भूमि खणोनी यज्ञकुंडही स्थापियलें
गंगेमाजी स्नान करोनी यज्ञमंडपीं झणिं आले
वेदघोष हे गर्जति ब्राह्मण ब्रह्मा गायत्री पुजिले
राज्य चालवुनि तप आचरती, अश्वपती अन् राजसती
सवत्सरहि अठरा झाले ब्रह्मा गायत्री भीती

विधि गायत्री प्रसन्न झालीं वर माग म्हणे भूपाला
"कुलदीपक हा पुत्र देई मज इच्छा पुरवीं जगपाला"
"दैवीं तुझिया पुत्र नसे रे कन्या होइल सुकुमार
त्रैलोक्यामधिं कीर्ति गाजवुनि करील तुमचा उद्धार"
ब्रह्मा देवी वर देउनियां जातीं तीं स्वस्थानासी
अश्वपती अणि महादेविच्या मोद वाटला चित्तासी
शुभदिनिं मासीं महादेविसी गर्भ राहुनी तेज चढें
पुसति डोहळे जननी पुरवी द्राक्षें, अननस, दुध, पेढे
अठवें मासीं करिति अठांगुळ वस्त्राभरणें भूषविलीं
केलीं नानाविध पक्वानें ओटि सख्यांनीं हो भरिली
नऊ मास हे पूर्ण होउनी सुंदर कन्या अवतरली
अन्नदान हें करी अश्वपति गोदानेंही बहु दिधलीं
दिनीं पाचवे करुनी जाग्रण जिवती सटवीसी पुजिलें
तीन दिवस ते सावित्रीच्या भाळीं वैधव्या लिहिलें
अकराव्या दिनिं स्नान करुनियां सोनसळी ती मग ल्याली
बळीराज पुजुनिया अंगणीं भानुदर्शना ती आली
न्हाणी बुजवुनि सुवर्ण मौक्तिक मान दीधला सुइणीसी
सुवर्ण पालख जडित चांदवा कोरी राघू चिमणीसी
सटीबारसें करिति सुवासिनि नांव ठेविलें सावित्री
भरजरि कुंची ताइत बिंदली लेवुनि खेळे निजपुत्री
अश्वपतीची सुता दिव्य ती गायत्रीनें जी दिधली
रूपशील जणुं सद्गुणखाणी माता पितया प्रिय झाली

मराठी ग्रंथ संग्रहालय
नं. ७४८
मराठी ग्रंथ संग्रहा
स्थळ प्रत

मंजुळ बोले दुडदुड चाले कुतूहलातें करि जननी
चंद्रकलेसम उपवर झाली चिंता वाटे राजमनीं
वर्ण केतकी सरळ नासिका कुंतल कुरळे मृगनेत्री
कोमल गात्री विलसे कमला चपलेसम ती सावित्री
"चिंता त्यजुनी वर वधण्याची आज्ञा मजसी जरि द्याल"
"मोद मन्मनीं होइल ऐसा वर शोधीं तूं कुलशील.
प्रधानमंडळ सवें घेउनी वर पाहाया जा बाळे"
पित्राज्ञेनें निघे बालिका नमन करोनी शुभ वेळे
इंद्र चंद्र अणि इतर लोकिंही फिरुनी बाला बहु श्रमली
समानगुण वर मिळे न कोठें म्हणुनि काननीं अवतरली
जननी जनका सेवितसे तो सुपुत्र नयनीं देखियला
सत्यवान हा मदनमनोहर सावित्रीनें मनिं वरला
गृहीं येउनी राजसभेसी पितयासन्निध ती बसली
अमात्य बोले-"सत्यवंत पति वरुनी कन्या तव आली"
इतुक्यामाजी नारद मुनि ते राजसभेमाधिं अवतरले
आसन देउनि अश्वपतीनें मुनिचरणासी पूजियलें
राजर्षि पुसे-"कुशल असेना म्लानवदन तव कां झालें?
राज्यभ्रष्ट हा सत्यवान परि मन कन्येनें त्या वरिलें
चतुर सद्गुणी सत्यभाषणी तप तेजें जणुं रवि दुसरा
पितृभक्त तो मातृभक्तही गमे कपिल ये अवतारा."
नारद सांगति–"परि अल्पायुषि सत्यवंत, वर वरिं दुसरा"
"पतिनिष्ठेचें तेज दाखविन परंतु न वरि वर दुसरा"

सावित्रि वदे—" अल्पायुषि जरि वीर प्रतापी गुणवंत
सहस्र वर्षे काक भूवरी अप्रिय सकलां बलरहित "
निश्चय देखुनि सावित्रीचा विधिनंदन तो गंहिवरला
ज्येष्ठ पौर्णिमा त्रीरात्रींचा वटपूजन विधि कथि तिजला
लग्नसिद्धता करुनि सर्वही मूळ धाडिलें गजानना
सुरवर मुनिजन सर्वहि येती संगें घेउनि सुतललना
वऱ्हाड सारें वनीं पातलें शाल्वपतीसी भेटविलें
" कन्या देतों तव पुत्रासी " अश्वपतीतें विनवीलें
" राज्यभ्रष्ट मी, तव सुकुमारी कां देसी मम पुत्राला "
" तव पुत्रासी मम कन्येनें निश्चय करुनी पति वरिला "
निश्चय ऐकुनि सावित्रीचा क्षणभर चिंता मनिं करि तो
शाल्वपती तो संमति देउनि अश्वपतीला कळवीतो
'मान्य असे मज' शब्द ऐकुनी अश्वपती त्या नमन करी
साखरपूडा होउनि सत्वर तिथि निश्चयिली शुभवारीं
ग्रहमख झाला, रुखवत लाडू होउनि अक्षत विनायका
देवुनि अंदण यादी लिहिली गजरथरत्नें बहु देखा
शेवति, वाङ्‌निश्चय, वरपूजन होउनि अंदण हो दिधलें
भोजन करुनी घेति विसांवा, प्रातःकालीं हो उठले
घाणा होउनि तेलफळादी, उष्टी हळदहि पाठविली
दोन्ही सदनीं मंगल स्नानें करुनि देवकें ठेवियलीं
लग्नघटी बहु सन्निध आली रुखवत वाढि महादेवी
लाडू, मोदक, शाखा, लोणचिं, पक्वानेंही बहुत नवीं

आपोष्णीला दूध घालुनी जामातासी देइ विडा
नेत्रीं काजळ, पायीं जोडा, बसण्या सुंदरसा घोडा
वाजत गाजत वरासि नेलें लग्नमंडपीं झणि आलीं
नारळ फोडुनि करि कुरवंडी, मधुपर्कादी करवीलीं
चुडे लेवुनी न्हाउनि माखुनि अष्टपुत्रि मग नेसविली
मळवट रेखुनि गौरिहरासी पूजित बसली वेल्हाळी
मंगलसूत्रा कंठीं बांधुनि बहुल्यासन्निध आणविली
मंगलाष्टकें ब्राह्मण म्हणतां मस्तकिं अक्षत टाकियली
लग्न लागलें, मंगल झालें, मंगल वाद्यें वाजविलीं
परस्परांतें अर्पिति माला, वधूवरें तीं प्रमोदलीं
आदरवचनें सुवासिनींना हळदीकुंकू देवविलें
नारळ गोधुम ओटी भरुनी गुलाब अत्तर लावियलें
महादेविसह अश्वपती करि कन्यादाना विधियुक्त
चंद्र-सूर्य ते साक्ष ठेवुनी सत्यवंतकरिं तिज देत.
कंकणबंधन तसेच होती लाजाहोमहि सप्तपदी
प्रसन्न अग्नी बालरूप धरि मान बंधुचा घेत अधीं
सुनमुख होउनि, रेखुनि कुंकुम, गांठी दिधल्या पदरासी
नरनारी ते कौतुक करिती नांवें घेतीं बहुसरसीं
ओटी भरतां निजमातेनें वंदन करितां गंहिवरली
वधूवरांतें मिरवित नेतीं, गृहीं सुवेळीं प्रवेशलीं
श्वशुर-सासुसी वंदन करण्या पतिसह सावित्री आली
लक्ष्मीपूजन करितां उभयहि कृष्ण-रुक्मिणीसम दिसलीं

घीवर, मांडे, जिलबी केशरि, वरणभात, दधि, शिरा-पुरी,
शाखा, लोणचिं, सुवर्णपात्रें, पाट, रांगोळ्या बहुकुसरी
भोजन सारुनि सर्व बैसलीं विडे दक्षिणा वाटियली
व्याहि-जांवया अहेर केले, विहिणीलागीं चिरचोळी
माय सांगते --" श्वशुर-सासुसी सेवुनि प्रिय हो तूं बाळे
पूजनपात्रीं भरुनि पुजेचें पूजि तुळसिला वेल्हाळे
देवालयीं अणि यज्ञमंडपीं सडासमार्जन करि कथितें
रंगवल्लिका, स्वस्तिक, कमलें, काढीं श्रीगोपद्मांतें "
" किमपिहि चिंता न करीं ताता जावें आतां निजसदनीं
पतिसगें मी वडिलां सेवुनि मोदें राहिन घोर वनीं "
" पुत्रासम हिस पालन केलें, अजि तुमच्या हो करिं दिधली ".
हृदयीं धरुनी, साश्रु वदोनीं, मायबाप मग गृहिं गेलीं
श्वशुर-सासुची सेवा करुनी पतिसेवाही करि बाला
कालचक्र स्थिर लव नच राहे, ज्येष्ठ मास दिन झणिं आला
मुनिशब्दांतें स्मरुनि सती ती चिंता मानसिं बहु करिते
त्रीरात्रीचें करी उपोषण, रमवी, सुखवी निजपतितें
" तुम्हांसंगें दिनीं आजच्या येइन मी वनिं कीं गमतें "
" आज्ञा घेउनि मम जननीची येईं न धरिं कोपातें "
सासू बोले–" सोडिं उपोषण, चंद्रवदन तव बहु सुकलें "
" उदयीकचि मी करिन पारणें " वंदुनि शुभवर मिळवीले
सुतगुंडी, फणि गजदंताची, अक्षत, कुंकु, चुडे, पत्री,
गंधधूप दिप नैवेद्यादिक घेउनि निघते सावित्री

श्वशुर-सासुची आज्ञा घेउनि पतिसंगें ती जाय वना
मयूर नाचति, हरिण खेळती, क्रीडा देखे मृगनयना
" काळसर्प ये मार्ग रोखुनी अपशकुन सखे मज झाला "
" प्राणपती अजि दूर न जावें वारिल प्रभु तव चिंतेला "
बकुल, मालती, पुष्पें फुललीं, रमली रानीं ना श्रमली
पतिवचनातें ऐकुनि श्रवणीं सती मानसीं घाबरली
सत्यवंत तैं म्हणे–" प्रिये तूं दिससी मजला बहु श्रांत
नाजुक पुष्पांमध्यें शेवती सतिमाजी तूं गुणवंत
सुफलें पुष्पें तोडुन आणिन घे विश्रांती या ठायीं "
" वनशोभा मीं येइन बघण्या पुष्पें तोडिन लवलाहीं "
वनपुष्पें जैं तोडित असतां विषकंटक तो पदिं रुतला
तिडिक निघोनी जाय मस्तकीं मूर्च्छित पडला धरणीला
पतिमस्तक तें घेउनि अंकीं शोक करित ती वनिं बाला
श्रमली, दमली, मूर्च्छित पडली, काळपुरुष मग तिज दिसला
" दिव्य कांति तव नाम असें जें कळतां होइन मी धन्य "
" सत्य पुरुष हा नेण्या आलों यमधर्मचि मी ना अन्य "
विचार करुनी शोक आवरी, केशभार झणिं सांवरिला
" व्रतपुण्यें मी जिंकिन काला " दृढनिश्चय हा मनिं केला
शवा पतीच्या ठेवुनि वृक्षीं नमन करी यमधर्माला
" अष्टपुत्रि भव " शब्द ऐकुनी शकुनगांठ दे पदराला
" कृपावंत तूं सोमनाथजी, भीषण विपिनीं मी अबला
कुलस्वामिनी श्री जगदंबे साह्य करा तव कन्येला "

पाश घालुनि प्राण काढुनि रविसुत लागे मार्गासी
" वनदेवींनों राखण बैसा जाउनि आणीन मम पतिसि "
महिषावरती आरुढ होउनि रक्तवस्त्र हें परिधान
हेमपादुका पायिं घालुनि दक्षिण पंथें करि गमन
मागें पाहुनि सतीस बोले-" कशास येशी मम संगें?
घोर काननीं भीति असे तुज श्वशुरगृहासी जा वेगें "
सती म्हणे-" ही साधुसंगती, भीती नुरवी मम चित्तीं
पतिसांगातीं जावें सतिनें धर्म सनातन ऋषि वदती
धर्म म्हणविसी, निष्ठुर होसी, अधर्म करीसी हा दोष
रोष सोडुनि पति मम द्यावा, करीन अपुला जयघोष
पतिविण सतिला प्रिय नच मोक्षहि स्वर्ग तुच्छ हा गाणि युवती
पतीवांचुनी जीवन जगिं त्या अवमानीती, जन हंसती
बंधु नसे मज, पतिविरहित मी देखुनि दुःखी मम जनिता "
बोले यम तिज-" शत सुत दिधले तव पितया तूं जा आतां "
" मायबाप हे देत मापुनी तेथें न उरे मम सत्ता
अमाप दाता दे मज आतां हेंचि मागतें सूर्यसुता!
सासुसासऱ्या राज्य नेत्र दें, वर हा मागें तुजपाशीं "
" राज्यनेत्र हे दोन्ही दिधले जा बाळे निज सदनासी "
" सदनीं जाउन भोग पतीविण सांग कुणाला आवडती?
' अष्टपुत्रि भव ' तूं वदलासी पतिविण पुत्र कसे होती?
विष्णुपदींही पिंड अर्पितां मुक्ति लाभते पितयासी
पुत्र विण मुळें नच मुक्तीतें वदतीं शास्त्रें आणि ऋषी "



मराठी ग्रंथ संग्रहालय
८४१८
मराठी ग्रंथ संग्रह
स्थळ प्रत

"वेदांताचें रहस्य कथुनी तपस्विनी मज हरवीलें
कृतांत परि मी तरि मन द्रवलें, दूत न येती तुज भ्याले
शास्त्रमान्य हे बोल कुशल तव सुधातुल्य कीं मज रुचले
बहु प्राशिलें मन बावरलें, वर घेउनि तूं फसवीलें
सावित्रीची बुद्धि आगळी देखुनि नवलचि मज गमलें
सती येउनी पतीस नेईल, नारदवचना मानिं स्मरलें
सावित्री तूं आतां जाई, वर देऊं गे किती तुला?"
"पतीस घेइन तरीच जाईन, ना तरि अर्पिन प्राणाला"
सत्याग्रहि सति सावित्री धरि अग्निस्तंभ यमद्वारींचा
चंद्र-सूर्यही उगवुं न देई धीर लोपला धरणीचा
पतिव्रतेचें तेज आगळें रविनंदन हा घाबरला
"शत सुत घेई, पतीस नेई, न करीं मम अपकीर्तिला
सत्य, मित, प्रिय, मृदुल, मनोहर, दोषरहित तव वचन असे
सान वय तुझें परि तें प्रांजल, हितकर धीटहि प्रौढ दिसे
चतुरपणा तव चकित करी मज कर जोडीतों जा बाळे"
कालपाश तो काढुनि घेई, यमद्वारही बुजवीलें
"ताता अजि मी कृतार्थ झालें, चुडेदान तूं मज देसी"
यमधर्मासी नमन करोनी लगबग गेली पतिपाशीं
"गुरुजन करिती चिंता सदनीं निद्रेलागीं कां वरिलें
जागृत व्हावें"-विनवी पतिसी मंजुळ मधु ती मग बोले.
जागृत होउनि पाहे तिजला स्वप्न सांगतो कांतेसी
"कालपुरुष तो घेउनि जातां सोडविलें, सखि तूं मजशीं"

पुष्पवृष्टि ती करिति तयांवर देव विमानीं अवतरले
" अखंड भोगीं सौभाग्यातें आशिर्वच घे तुज बाले "
इकडे व्याकुल जननि जनक ते शोक करुनि वदती भुवनीं
" शोधुं कुठें तुज सांग राजसा, टाकुनि जासी घोर वनीं "
स्नान करोनी सावित्रीनें पतिसह वटतरुसीं पुजिलें
नैवेद्यासी घेत आम्रफल हळदीकुंकुम वाहियलें
प्रयाग ग्रामीं सावित्रीनें प्रेमें वट जो पूजियला
अद्यापीही साक्ष असे तो जनतेलागीं पहाण्याला
वायन देउनि गृहासि गेले मातापितया वंदियलें
सावित्रीनें वृत्त सांगतां प्रेमें तिजशीं हृदिं धरलें
त्रीरात्री व्रत पूर्ण होउनी यज्ञकुंड हें उघडीलें
शतपुत्रांतें देखुनि सुंदर पतिपत्नी ते प्रमोदले
चंद्रोदयिं मग दांपत्यासी भोजन तांबुल ती देई
सासू-श्वशुरा पतीस वाढुनि करी पारणें लवलाहीं
महादेविसह अश्वपतीनें यज्ञकुंड हें उघडीलें
सावित्रीच्या वरप्रसादें शतपुत्रांतें देखियलें
वाद्यें वाजति नौबति झडती छत्रचामरें दळभार
शत्रु येउनी राज्य अर्पिती शाल्वपतीशीं करभार
समस्त वरही प्राप्त जाहले, जननी-जनकाहि भेटविले
सत्यवान् स्वयें राज्य चालवी, पिता प्रजाजन सुखवीले
सत्यवंत भूपती होउनी, भारतभूला भूषविलें
सकल प्रजाजन हर्षभरित कीं, न्यायनीतिला कारिं धरिलें

सावित्रीनें तेजें अपुल्या यमधर्मासीं नमवीलें
सावित्रीचें कार्य संपलें शकुनगांठिसी सोडविलें
अहंकार हा सर्व सोडुनी सावित्रीचें व्रत घ्यावें
भक्ति मुक्ति अन् सौभाग्यातें देइल पुजितां सद्भावें.
सावित्रीचें चरित्र गाती, श्रवणहि करिती ज्या नारी
भवसागर हा तरुनी जातिल संतवाणि ही अवधारीं
सासु-सासरे **गंगा केशव** पूज्य असाति मम बहु मजला
नाम असे **शिवराम** पित्यासी, म्हणति **पार्वती** जननीला
कवयित्रीचे पती **प्रभाकर, पाटणकर** हें उपनांव
सुत **नारायण** स्नुषा **इंदिरा,** दुहिता **चंपु, विटें** गांव
सावित्रीचें चरित्र रचिलें **सावित्रीनें** अल्पमती
जरी वांकुडे, शब्द बोबडे, क्षमा करावी ही विनती
**एकोणिसशें बत्तिस सालीं ठाणें शहरीं** गुंफियली
सावित्रीची चरित्रमाला हिंदु भागिनींना अर्पियली.

---

## ५. सावित्रीची आरती

( चाल—**धन्य जगीं या गुरुवर्य** )

जय जय जय जय सावित्री सति, तुजला विनवितें ।
अखंड देईं सौभाग्यातें हेंची मागते ॥ धृ० ॥

राज्यभ्रष्ट तरी सद्गुण पाहुनि सत्यवान वरिला ।
अल्पायू या मुनिवचनें तव निश्चय ना ढळला ॥ १ ॥

यमधर्मा सुवचनें जिंकुनी पतिप्राणा आणिलें ।
आप्तसुखास्तव वर मिळवोनी किर्तिस गाजविलें ॥ २ ॥

चरिता ऐकति प्रेमें ज्या तव नारी या जगतीं ।
वटपुजना आचरती भावें, तव पादिं त्या रमती ॥ ३ ॥

पंचविषय हे दीप लाउनी ओंवाळित तुजला ।
भक्तिशर्करा देईं निरंतर इच्छी **शिवबाला** ॥ ४ ॥

---

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं. ........ नं. ........
ता. ........

# गीतवैजयंती

## भाग दुसरा

# अनुक्रमणिका

## भाग दुसरा


१. गणपतिस्तवन.
२. मोरयास.
३. श्रीकृष्णप्रार्थना.
४. वडील बंधूस.
५. तान्हुला मजवरी रुसला.
६. देवकीचा कान्हा.
७. नौका.
८. भक्तिमार्ग.
९. देवी गिरिबाला (आख्यान).
१०. दाशरथी राम.
११. गोदावरी.
१२. कामधेनु.
१३. कृष्णजन्म.
१४. हट्टी कृष्ण.
१५. पाळणा.
१६. कन्हया.
१७. श्यामसुंदर.
१८. गोपाळ.
१९. मनमोहन.
२०. पाठीराखा.
२१. मुरली.
२२. बावरी राधा.
२३. राधिका.
२४. गवळण.
२५. भामेचा रुसवा.
२६. कंसदूत.
२७. यशोदेची हांक.
२८. मुकुंदाचा धांवा.
२९. धेनूचा धांवा.
३०. धेनु मातेचा धांवा.
३१ डोंबिवलीचा मुरलीधर.
३२. फुलबाग.
३३. उंदिरमामाची गंमत.
३४. कांकड आरती.
३५. गणपतीची आरती.
३६. बोडणाची आरती.
३७. जिवतीची आरती.
३८. हरितालिकेची आरती.
३९. कामधेनूची आरती.
४०. सद्गुरूची आरती.
४१. निरोप.
४२. आशीर्वाद.
४३. गोविंदाचा छंद (श्लोक).
४४. सांजवात.
४५. सूर्योदय.
४६. प्रणाम.
४७. स्फुट भजनें.
(साठेकृत स्मृति – पुरवणी).
१. स्वागत.
२. तळमळ.
३. मैत्रीणींचे डोहाळे.
४. विहिणींना विनंति.
५. कौसल्येचे डोहाळे.
६. हंसरी राधिका.

# अर्पणपत्रिका

मातेवीण कुणी न थोर जगतीं

प्रेमा न मातेविना ।

मातेवीण न देवता

लव नसे श्रेष्ठत्व नारायणा ॥

केलें लालन पालना जननिनें

सन्मार्गही दाविला ।

साध्वी पार्वति तत्पदांबुजि असे

हा ग्रंथ मीं अर्पिला ॥ १ ॥

—सावित्रीबाई पाटणकर

मराठी ग्रंथ संग्रहालय.
स्थळ प्रत
सं. ......... नं. .........
ता. .........
ठाणे.

# गीतवैजयंती

[ भाग दुसरा ]

## १. गणपतिस्तवन

( चाल – **नव हिंदराष्ट्र झेंड्या** )

गणराज गौरीकुमरा वंदुं या आधीं ॥ धृ० ॥
प्राशन करितां नामसुधा तव कालहि ना बाधी ॥ १ ॥
दयासागरा मंगलमूर्ते भेट देई जलदी ॥ २ ॥
**शिवतनया** करि विनति शारदे देइं मला बुद्धी ॥ ३ ॥

---

## २. मोरयास

( चाल – **भास मला जाहला.** )

वाट किती पाहूंऽ सांग मोरया रे । नागलोक, स्वर्गभूसि, दश दिशा भरुनि उरसि म्हणुनियां शरण तुजसि धांवुनियां येत मोरया रे ॥ धृ० ॥ अंतपार नाहीं कुणा, परि दिससि भक्तजना, सगुण रूप सुखवि मना, पाहतांचि गौरिबालका रे ॥ १ ॥ **शिवकन्या** बुद्धिहीन दीन चरणीं होई लीन, विमल मती देइं पूर्ण, इच्छितसे गौरिबालका रे ॥ २ ॥

---



मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क. 4347
(स्थळ प्रत)

## ३. श्रीकृष्णप्रार्थना

( चाल – **आई म्हणोनी कोणी** )

श्रीकृष्ण नंदतनया । निजलासि ऊठ वेगें ।
कलिकाल-घोरलीला । होताति धांव वेगें ॥ धृ० ॥

दीनास तूंच वाली । भूमाय त्रस्त झाली ।
अज्ञानपंकिं रुतली । सोडीव याच काला ॥ १ ॥

तानाजी वीर कोठें । रणधीर बाजि कोठें ।
स्मरतांचि कंठ दाटे । शिवबा स्वराज्यवाला ॥ २ ॥

संभाजि रत्न हरपे । अवनींत कीर्ति तळपे ।
देखोनि काळ कांपे । रणशूर त्या विरांला ॥ ३ ॥

विश्वास पेशवा तो । अभिमन्यु वीर सम तो ।
शत्रूंस काळ गमतो । तो बाळ हाय गेला ॥ ४ ॥

समरांत वीर पडती । राष्ट्रासि भूषवीती ।
प्यारे जगास होती । धरुनी मनीं तवाशा ॥ ५ ॥

परि हाय आज थोर । अज्ञान अंधःकार ।
तूं दीनबंधु थोर । नकळे कसा न येसी ॥ ६ ॥

अज्ञातवास अमुचा । जगतांत सत्य साचा ।
**शिवरामबालिके**चा । प्रभुजी प्रणाम घ्यावा ॥ ७ ॥

---

## ४. "वडील बंधूस –"

( वृत्त – राजहंस. )

प्रेमहीन धन जन वायां । श्रुत तुम्हां बंधूराया ॥ धृ० ॥
कर्तव्या करण्या शिकलां । प्रेमाचा पाझर अटला ।
हो फरक कशास्तव नकळे । बहु विचार दुखवी मजला ।
निष्प्रेम पाहुनी कृतिसी । जीव हा फार तळमळला ।

तुम्हि थोर सान मी सत्य
रोष ना मजवरी युक्त
राग हा स्त्रियांना उचित

शिकवणें सत्य हें वायां । श्रुत तुम्हां बंधूराया ॥ १ ॥

मातेच्या एका उदरीं । जाहले जन्म हे अपुले ।
समजावुनि सांगा मजला । अपराध जरी मम झाले ।
कोणतें शल्य हृदयांत । रुतुनीयां तुमच्या बसलें ।

कुणि गढुळविलें प्रेमाला ?
समजेना मुळिं हें मजला.
लव शांति नसे चित्ताला

यातना पहा न सहती या । श्रुत तुम्हां बंधूराया ॥ २ ॥

पत्रलेखनासी बसतां । पूर्व दुःख मजसी स्मरलें ।
येउनी कंठ भरुनी हा । अश्रू हे नयनीं जमले ।
होउनी स्मरण ताताचें । जग भीषण स्वमना गमलें ।
कर्तव्य म्हणुनि निज सदनीं
बोलाविलि व्यर्थाचि भगिनी
प्रेमा ना अंतःकरणीं
अपमानीं दुःख कसें या । श्रुत तुम्हां बंधूराया ॥ ३ ॥
तुम्हि पत्रीं बोलावीलें । उत्तरा कवनिं या दिधलें ।
मम मानस सर्वहि कथिलें । वहिनीसह तुम्हां नमिलें ।
धाडुनी पत्र कळवावें । जरि अपुल्या हृदया पटलें ।
मातेविण कवणा माया
जनकाविण नाहीं छाया
वडिल बंधु पितया ठाया
जनरूढी अशि ही जगिं या । श्रुत तुम्हां बंधूराया ॥ ४ ॥
अपुल्या मनिं प्रेम अपार । दुसऱ्यावरि करितां दिसतें ।
लोपुनी सर्व मद्विषयीं । कर्तव्य मात्र तें उरतें ।
प्रेमानें करण्या जातां । विपरीत तुम्हांला गमतें ।
कर्तव्य करां परक्यासी
कर्तव्य नावडे मजसी
मी क्षुधित असें प्रेमासी
वश करी प्रेम हें हृदया । श्रुत तुम्हां बंधूराया ॥ ५ ॥

पूर्वीसम प्रेम करोनी । प्रियभगिनी मजसि म्हणावें ।
सांगुनी प्रेम कां मिळतें । याचि तें मना जरि ठावें ।
दुःखानें मन हें वेडें । प्रेमाश्रयिं इच्छि राहावें ।
निर्धना असे ही भगिनी
विसरला प्रेम कां म्हणुनी ?
मनिं विचार हे दिनरजनीं
ते केले सर्व क्षणीं या । श्रुत तुम्हां बंधूराया ॥ ६ ॥

---

## ५. " तान्हुला मजवरी रुसला "

( वृत्त – अक्रूर )

किति शोक करूं हृदयीं चरका बसला । तान्हुला मजवरी रुसला ॥ध्रु०॥
गृहिं नसतां मी नातू सदनीं अणिला । येवोनी प्रथम देखीला ।
मीं त्यास अहा नाहिं पुरा खेळविला । तों काळें ओढुनि नेला ।
तिट-काजळ नाहीं केलें
पायांवरिं नच न्हाणियलें
नच लेणें बाळा केलें
कधिं स्वकरें त्या नाहीं हो भरवीलें । गुणवर्णनिं नच मी थकलें ॥ १ ॥
यम दुष्ट असे भेदभाव त्या नाहीं । बाळ तरुण जरठ न कांहीं ।
मज गमतें हें बाल त्यास आवडलें । म्हणुनियां तयानें नेलें ।
कमलासम नेत्र विशाल
कुरळे किति कुंतल मृदुल
हास्य मधुर बोले बोल
त्या सौंदर्यें भान हरपलें बाई । दृष्टाळुनि कैसा जाई ॥ २ ॥

हो नातू हे झाले दोनच मजला । आज ना एकही उरला ।
मनिं झुरतें मी अठवुनि त्याच्या लीला । मम कंठ भरुनियां आला ।

कटिं घेउनि नाहीं फिरलें
कुलदेविसि नाहीं नेलें
मनिं कौतुक मनिंचें विरलें

हें रत्न करीं दैवा नच पाहवलें । दुष्टानें काढुनि नेलें ॥ ३ ॥

करिं घेई तो चेंडु फुगा कीं चिमणी । नाचतो चांद हा बघुनी ।
टॉमीशि तसा मनिशीं खेळे भुवनीं । वदे मंजुळ हम्मा म्हणुनी ।

किति सांगु तयाच्या लीला
शिशु जमवुनि करितो मेळा
मधुरव करिं घुंगुरवाळा

झणिं मातेचें हृदय धांवुनी येई । प्रेमानें चुंबन घेई ॥ ४ ॥

सौख्यास सिमा झाली म्हणुनी आला । दुःखमेरु आडवा त्याला ।
फुटतात तया दंत म्हणुनि ज्वर आला । मन वेडें वाटे त्याला ।

घे डॉक्टर तापप्रचीती
नच कळे तया नाडी ती
शिशुतनू सुकुनि जाई ती

परि रोग्याची चिंता मुळिंना चित्तीं । सर्व लक्ष पैशांवरती ॥ ५ ॥

मुळिं गूण नसे सोडि हृदय धैर्याला । डॉक्टरच्या असुरी लीला ।
कुणि गरिब असो मोटर त्यास हवी ती । शंभरांत एकच सुमती ।

सुखि दुःखी समची गणिला
बिल राक्षस ग्रासित सुटला
हें ठाउक सर्वत्रांला
मनिं आठवितां हाय भयंकर वेला। क्लेश होती लिहितां मजला ॥ ६ ॥

रंगीत पहा पाट इथें हा पडला। नव गादी मुकली त्याला।
मुख कोमेजें धैर्यमेरु ढांसळला। निशि भीषण गमली मजला।
मज शेवटिं पापा दिधला
अवलोकी निज मातेला
गुदूगुदू दूधही प्याला
हा तेजाचा तारा निखळुनि पडला। तो शोक नये लिहिण्याला ॥ ७ ॥

त्या स्मरुनीयां माता हृदयीं झुरते। पितयाला चैन न पडतें।
त्या दुःखानें आजी स्वमनीं कुढते। स्मृति दुःखें निशिदिनीं जळते।
**शिवकन्या** विनवी एक
तूं प्रभो दयाघन ऐक
दे नातु शतायू एक
नच दुसरें मी कांहीं मागें तुजला। ही आस पुरविं जगपाला ॥ ८ ॥

---

## ६. देवकीचा कान्हा

( चाल – **गोकुळींचा कान्हा माझा** )

देवकिचा कान्हा माझा पाहिला कीं काय ग ! ॥ ध्रृ० ॥

बंदिशाळें जन्म झाला । गोकुळांत पोंचवीला ।
शत्रुभयें लपवी कान्हा । नंदगृहीं काय ग ! ॥ १ ॥

मध्यरात्रीं वसूदेव । त्वरें नेई वासूदेव ।
प्रभूस्पर्श होतां यमुना । दुभंगली काय ग ॥ २ ॥

कंसराया कळली मात । बंदिशाळे आले त्वरित ।
शत्रु माझा कोठें गेला । सांग लवलाही गं ॥ ३ ॥

कन्या झालि कंसराया । शत्रुभय गेलें विलया ।
मारुं नको बालका या । वंदि त्याचें पाय ग ॥ ४ ॥

कन्या करें ऊचलली । शिळेवरी आपटली ।
नभोवाणी कानीं पडतां । कंस भिउनि जाय ग ॥ ५ ॥

जळीं स्थळीं आठवा भरला । रिता कुठें ठाव न उरला ।
कृष्णभयें कंसमामा । वेडा झाला काय ग ॥ ६ ॥

**शिवतनया** विनती करिते । हरिचरणा दृढही धरिते ।
भवसरितेमाजी बुडते । तारिं गुरुमाय ग ॥ ७ ॥

---

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं. ........ नं. नौका
ता. ........
ठाणें.

## ७. नौका

( चाल - **अर्जुना इतर मज** )

भवसागर तरुनी जाया । लाभे तुज मानवकाया । नाव ही ॥ धृ० ॥
भवसिंधू दुस्तर मोठा । विषयाच्या उठती लाटा । घोर या ।
षड्रिपू खडक हे थोर । मायेचीं पटलें फार । पसरलीं ।
वाहतो ।
वायु चंड तो ।
मना भुलवितो ।
भडकुनी जाई । इंद्रिय ही नौका पाहीं । सागरीं ॥ १ ॥
विषयाच्या ध्यानें होतो । विषयाचा संग घडे तो । मानवा ।
संगानें मोहचि आला । मोहानें मतिभ्रम झाला । यापरी ।
नष्टवी ।
बुद्धि सत्य ही ।
अधोगति तई ।
सहजचीं येई । नरतनु ही व्यर्थचि जाई । त्याक्षणीं ॥ २ ॥
विषयत्याग सोपा नाहीं । अनुभव हा सर्वांचाही । सांगती ।
यास्तव तूं देवापायीं । कर्मे तव सारीं वाहीं । भक्तिनें ।
भक्तिचा ।
मार्ग हा खरा ।
करुनियां त्वरा ।
प्रभुपदिं नेई । मग चुकाशि जन्ममरणाही । या भवीं ॥ ३ ॥

यास्तव तूं जलदी करुनी । भवजलधी जाईं तरुनी । हे मना ।
पूर्वभाग्य म्हणुनी तुजला । नरदेहलाभ हा झाला । भूवरीं ।
यापरी ।
वर्तसी जरी ।
सहजची तरी ।
तरुनियां जासी । जा मिळुनी ब्रह्मस्वरुपासी । मानवा ॥ ४ ॥

---

## ८. भक्तिमार्ग

(चाल – **डोळे हे जुलमी गडे**)

भूलोकीं सुलभ गडे भक्तिमार्ग हाचि निका । नामसुधा प्राशि जरी तारी हीन दीन ठका । परमार्था सतत वरी ना तरी हा देह फुका । योग नको याग नको । जपतपहीं कांहीं नको । हृदयिं धरी भाव बरा सहज होय कृष्णसखा ॥ १ ॥

---

## ९. देवी गिरिबाला (आख्यान)

( चाल – **विदर्भकन्या रंगिं पातली** )

भवभयहारक सिद्धिविनायक मंगलदायक प्रार्थितसें
नमन करोनी सरस्वतीसी सद्गुरुचरणा वंदितसें ॥
हिमनगकन्या दाक्षायणि ती घोर वनासी झणिं आली
शिवशंकर हा पती मिळावा म्हणुनि तपातें आचरली ॥ धृ० ॥
कैलासीं शिव सुखें बैसले पार्वतिनें त्या विनवीलें–
“ अर्धांगी मी तुमची देवा व्रतें कोणते हो झालें ? ” ॥ १ ॥

" कोमल तनु तव झिजाविलि सखये मदर्थ "– तिजला शिव बोले –
" भाव हृदयिंचा तुझ्या देखुनी प्रेमें तुजला मीं वरिलें. " ॥ २ ॥
एके दिवशीं नारदमुनि ते हिमनगसदनासी आले
तदा तयानें आसन देउनि तच्चरणांसी पूजियलें ॥ ३ ॥
" मम कन्या ही उपवर झाली स्वरुपसुंदरा गुणराशी
विधीनंदना सांग वरा मज कन्या देऊं कोणासी ? " ॥ ४ ॥
नारद सांगे –" ऐक गिरिवरा कन्या दे श्रीविष्णूसी "
विधिनंदन तो वर सांगोनी, जाउनि भेटे विष्णूसी ॥ ५ ॥
" वैकुंठाधिप, ऐक "– मुनि वदे –" हिमनग कन्या दे तुजला. "
हंसुनि उत्तरा देई प्रभु तो –" वरिल सत्य ती शंभूला. " ॥ ६ ॥
इकडे मुनिचे शब्द ऐकुनी मानासिं अंबा बहु भ्याली
सखी येउनी करी शांतवन घोर वनासी मग गेली ॥ ७ ॥
महाभयंकर सिंह व्याघ्र हे करिति गर्जना अति थोर
रीस धांवती, सर्प बैसले दंश कराया भयंकर ॥ ८ ॥
निर्भयचित्तें सखिसह वनिं त्या ध्यान शिवाचें मांडियलें
तुलसि बेल आणि केतकिं दुर्वा अर्कपत्रही आणियलें ॥ ९ ॥
जाइजुईच्या पुष्पमंडपीं कदलीतोरण लावियलें
गंगेमाजी स्नान सखीसह करुनि आणिली कुंदमाले ॥ १० ॥
वालुकामयें लिंग करोनि कैलासेशा पूजियलें
तऱ्हेतऱ्हेची पत्री, कुसुमें, कुंकुमचंदन अर्पियलें ॥ ११ ॥
उपोषणासह जागर करुनी शिवा प्रभातीं वंदियलें
प्रसन्न होउनि 'वरीन' म्हणुनी शिव कैलासीं मग गेले ॥ १२ ॥

तात मायही झालि घाबरी गृहांत न दिसे प्रिय बाला
गिरीकंदरें कुत्रे शोधिले, मार्गीं न दिसे कवणाला ॥ १४ ॥
गंगातटिं मग हिमवंतानें निजकन्येसी पाहियलें
" रुसलिस कां तूं घोर विपिन हें, चल मजसंगें प्रिय बाळे " ॥१५॥
" नच येइन मी ताता सदनीं देसी मज तूं चक्रधरा "
गिरिजा बोले क्रुद्ध होउनी, पाहुनि कंपित होय धरा ॥ १६ ॥
चंद्रशेखरा पिनाकहस्ता पती मानसीं मीं वरिलें
मुदित होउनी हिमनग बोले –" शिवासि अर्पिन तुज बाले. " ॥१७॥
" सद्गुणसरिता मम ही दुहिता, निर्गुण जावइ नको मला "
सदनीं येता हिमनगपत्नी क्रोधें बोले निजपतिला ॥ १८ ॥
अंतरसाक्षी कळे शिवा हें, श्रीसह सगुण त्वरें झाला
गणसैन्यातें घेउनि संगें, गिरिवर सदनीं मग आला ॥ १९ ॥
कन्या द्यावी तिजला गमलें, पाहुनि सुंदर मदनारी
निजकांतिचा निश्चय देखुनि, हिमनग गौरवि त्रिपुरारी ॥ २० ॥
हिमवंतानें वर पूजुनियां पार्वति प्रभुला अर्पियली
उमामहेश्वरविवाह होउनि कैलासीं तीं झणिं गेलीं ॥ २१ ॥
निजसदनींचें वैभव देखुनि, हांसे मानसिं गिरिबाला
सर्पवेटळी, फुटकी पाळी भूतगण गृहीं जमवीला ॥ २२ ॥
हरतालीकाव्रत हें भावें पूजुनि जागर ज्या करिती
सौभाग्यासी अखंड भोगुनि शिवपदासि त्या मग जाती ॥ २३ ॥
भाद्रपदीं हें शुक्लतिजव्रत, **शिवतनयेनें** वर्णियलें
एकोणिसशें बत्तिस सालीं ठाणें शहरीं जें लिहिलें. ॥ २४ ॥

---

## १०. दाशरथी राम

( चाल – **आनंदाचा कंद हरि हा** )

जानकिवर तूं प्रिय सकळासी म्हणुनी तुजसी गाईलें । जडलें मन पदकमलीं देवा स्वरूपीं भरुनी राहिलें ॥ धृ० ॥ दशरथनंदन दशभुज कंदन करुनि सुरनरां तारिलें । बिभीषणातें राज्य अर्पुनी अयोध्येंसि ते झणिं आले ॥ १ ॥ पदधुलि उडतां मुक्त सतीनें होउनि प्रभुपद वंदिलें । करुणासिंधू दीनबंधु हरि मुनिजन मानसिं राहिले ॥२॥ चापबाण करिं मदनमनोहर श्यामसुंदर सांवळे । रूप जयाचें वर्णन करितां शेषादिक हे भागले ॥ ३ ॥ छत्रचामरें बंधु तिघेजण स्वकरीं मोर्चेल वारिती । वामांकीं ते वसे जनकजा, सन्मुख ठाके मारुती ॥४॥ कमलनेत्र हरि विमलचरित तीं किरिट-कुंडलें शोभलीं । कांसे कसिला दिव्य पित्तांबर दीनजनाची माउली ॥ ५ ॥ तिलक केशरी निटिलावरतीं, चरणिं तुलसिदल वाहिलें । सिंहासनिं ते राम देखुनी **शिवतनया**मन गुंगलें ॥ ६ ॥

---

## ११. गोदावरी

( चाल – **झोका घेऊं या ग** )

चल जाऊं या ग । गोदावरीतीरीं शीव नयनीं पाहूं या ॥ धृ० ॥ सव्यभागीं विघ्नहर । वामभागीं वायुकुमर । अश्वत्थाचा वृक्ष थोर । उजवे घालूं या ॥ १ ॥ नागांसह पशूपती । पूजूनियां भावें भक्ती । हस्त जोडूनीयां स्तुती । भावें करूं या ॥ २ ॥ तरावया भव पार । स्नाना येती नारीनर । शोभा दीसे मनोहर । दीप सोडूं या ॥ ३ ॥ सिंहस्थाचें महिमान । गोदातटीं करूं स्नान । मुखीं वदे रामनाम । **शिवतनया** ॥ ४ ॥

---

## १२. कामधेनू

( चाल - **गतविभव तूं जरी होसी** )

पूजि भावें मना श्रीकामधेनू । देइ बल आयु तिज मी काय वानूं ॥ धृ० ॥ दुर्जनें छळियली कलियुगीं ही असे । तळमळे मन कसें हृदीं चिंतिताहे ॥ १ ॥ पृष्ठिं ब्रह्मा वसे कंठिं तो श्रीहरी । वसतसे मुखिं सदा त्रिपुरारी शंभू ॥ २ ॥ सूर्य-शशि नेत्र सुर मध्यभागीं पहा । पयसुधाही पहा अवनीतलाची ॥ ३ ॥ लक्ष्मि गंगा तशी तीहि श्रीशारदा । शरिरिं वसती जिच्या वरदायिनी या ॥ ४ ॥ यापरी देवता धेनु जगतीं असे । लव नसे कमतिहि नमितां पदांतें ॥ ५ ॥

---

## १३. कृष्णजन्म

( चाल - **सुखाचा सूर्य मावळतां - गझल** )

महा किती दैत्यजयें वधिले । कंसभय का त्या कसलें ॥ धृ० ॥ बंदिशाळेंत अवतरला । गोकुळीं कृष्ण पोंचविला । यशोदा अंकिं जो खेळे ॥ १ ॥ यशोदा गौळणीसदनीं । क्रीडतो कृष्ण अंगणीं । रांगुनी वृक्ष मोडियले ॥ २ ॥ मारुनी राक्षसी पुतना । करुनियां कंसकंदना । तत्पित्या राज्य अर्पियलें ॥ ३ ॥ मुक्तता तातजननीची । करुनियां भेटे हृषिकेशी । जननिनें हृदयिं त्या धरिलें ॥ ४ ॥ कंस हा नष्ट करण्याला । चरित हें दावि जनतेला । दुर्जना कौरवा वधिलें ॥ ५ ॥ होउनी सारथी पार्था । बोधिली त्यासही गीता । **शिवसुतेनें** तुजसि गाईलें ॥ ६ ॥

---

## १४. हट्टी कृष्ण

( चाल - हें असें कसें सरकार )

आम्ही सासुरवासि ललना अडवि कान्हा ॥ धृ० ॥ निजमंदिरिं मथन करितां । हरि आला असे अवचितां । घननीळ मागे नवनिता । परि हट्टी ऐकेना, अडवी कान्हा ॥ १ ॥ मी पोर असे गवळ्याची । जसि कोर द्वितिय चंद्राची । ही राणी असे अनयाची । हो दूर कमलनयनां ॥ २ ॥ सासुश्वशुर असतीं द्वारीं । दुडदुडा आला कंसारी । चुंबना देई झडकरी । किति धीट यदूराणा ॥ ३ ॥ परब्रह्म यमुनेच्या तिरीं । वाजवी मधुर बांसरी । क्रीडती गोपि श्रीहरी । **शिवसुता** विनवी चरणां ॥ ४ ॥

---

## १५. पाळणा

निजरे निज सखया । यदुराया । कोमल तुझि ही काया ॥ धृ० ॥
पालख जडिताचा । नवकुंसरी । बांधुनि रेशिम दोरी ।
हालवी येश्वदा । सुंदरी । तुजला बा मुरहारी ॥ १ ॥
ताइत, कटिं दोरा । अणि चाळ । वाजति पदिं खुळखूळ ।
कुंतल कुरळे ते । किति मृदुल । शोभतसे घननीळ ॥ २ ॥
भारतमातेचा । कैवारी । पांडवसाह्यकारी ।
गोकुळिं अवतरला । मुरारी । धेनूस्तव गिरिधारी ॥ ३ ॥
कोणा न कळे ही । तुझि माया । तारीं मज प्रभुराया ।
हाची वर मागे । **शिवतनया** । मति दे तव गुण गायां ॥ ४ ॥

---

## १६. कन्हैया

( चाल - **भजो रे भय्या राम** )

कन्हैया हरी भेट कधीं देसी । निष्ठुर कां होसी ॥ धृ० ॥
काम क्रोध मद मत्सर शत्रू । विलया कधिं नेसी ॥ १ ॥
उलट्या नामें वाल्मिक तरला । मज कां मोकलिसी ॥ २ ॥
क्षीरसागरा उपमन्यूसी । अपुंनि तोषविसी ॥ ३ ॥
गजेंद्राच्या हांकेसरशीं । धांवुनि झणिं येसी ॥ ४ ॥
बोल बोबडे **शिवतनये**चे । ऐकुनि कधिं येसी ॥ ५ ॥

---

## १७. श्यामसुंदर

( चाल - **भाव धरा रे** )

कसें तुज गावें । हें मजला नाहीं ठावें ॥ धृ० ॥ सच्चित् आनंदाचा कंद । म्हणती तुजला श्रीगोविंद । होसी नंदाचा तूं नंद ॥१॥ रूप तुझें हें मदनमनोहर । तनू सांवळी श्यामसुंदर । कुंतल कुरळे उडती भुरभुर ॥ २ ॥ वदनीं बालार्काची दीप्ती । रत्नप्रभेसम दंत चमकती । कमलनेत्र हरि तुजला म्हणती ॥ ३ ॥ मोरमुकुट शिरिं तुरा खोंविला । दिव्य पितांबर कांसे कसिला । कंठीं कौस्तुभ तुलसीमाला ॥ ४ ॥ तिलक केशरी भाळिं शोभला । मोहित होती त्या व्रजबाला । मधुर मुरलिरव गुंगवि सकलां ॥ ५ ॥ कानीं कुंडलें लुटलुट हलतीं । चरणीं घुंगुरवाळे वाजती । 'दीनदयाघन' भक्त गर्जती ॥ ६ ॥ शंखचक्र करिं गदापद्मधर । दैत्य मारिले कंसचाणुर । मुनिजन मानसीं ध्याति निरंतर ॥ ७ ॥ चतुर्भूज हरि तूं गिरिधारी । **शिवतनया** नमि तुज कंसारी । भवसिंधूतुनि तारिं मुरारी ॥ ८ ॥

---

## १८. गोपाल

( चाल - **अजि कमलनायका, मुरलि वाजवूं नका** )

अजि नंदबालका । धांव धेनुपालका । धांव विश्वपालका ।। धृ० ।। क्षात्रतेज जाइ पार । नित्य धेनु होति ठार । कधीं घेसि अवतार । यदुनायका ।। १ ।। गोकुळांत हृषिकेशी । गोवर्धना उचलुनि धरिसी। गोवत्सांसंगें रमसी । भक्तरक्षका ।। २ ।। गोसेवा घडत ज्यास । तया चुकति हे यमपाश । ठाव मिळे वैकुंठास । धेनुसेवका ।। ३ ।। विनंती तुज नंदात्मजा । परीसावी गरुडध्वजा । आली शरण चरणीं **शिव-बालिका** ।। ४ ।।

---

## १९. मनमोहन

( चाल - **सांग सांग जाउं नको** )

मनमोहना कां न येसि श्यामसुंदरा । तुजविण मी शरण कुणा जाउं श्रीवरा ।। धृ० ।। तात मात बंधु भगिनि तूंच सर्व रे । मृग-जलसम सर्व असें भ्रमत रे । धन वनिता दासदासी प्रपंच भोंवरा ।। १ ।। काम क्रोध लोभ मोह शत्रु झोंबले । आशा या नागिणिनें वेढे घातले । तुजविण मज सोडवलि कोण प्रभुवरा ।।२।। चतुर्भूज कमलवदन मूर्त्ति साजिरी । **शिवतनया** पूजितसे हृदय-मंदिरीं । कृष्ण कृष्ण वदनिं असो ह्याच दे वरा ।। ३ ।।

---

## २०. पाठीराखा

( चाल - होइ विजयी तूं रंभे )

भक्तकाजीं कां सांग गुंतलासी ? । हांक कां न घेसी ? । धांव हृषीकेषी ॥ धृ० ॥ धरुनि पल्लवा । ओढी फरफरा । महादुष्ट हा खरा । आतां तूंचि प्रभुवरा । झणीं येसी ॥ १ ॥ शब्द भगिनिचा । दीन ऐकुनी । हरी बावरा मनीं । आला गरुड त्यागुनी । पावलासी ॥ २ ॥ वसन ओढितां । दुष्ट दचकला । भक्तसंकटीं आला । पितांबर झांकिला । रक्षि भगिनिसी ॥ ३ ॥ **शिवसुता** आली । शरण तव पदां । चुकविं तूंच आपदा । सांग येसि हरि कदा । तारण्यासी ॥ ४ ॥

---

## २१. मुरली

( चाल - आई म्हणोनि कोणी )

तुझि गोड गोड मुरली । मुरलींत जादु भरली ।
मम चितवृत्ति हरली । तुझि गोड गोड मुरली ॥ धृ० ॥
राधाहि नव कुमारी । नेसूनि जरतारी ।
मौक्तीक चोळी ल्याली ॥ १ ॥
चल वेगें कुंजवनिं या । निशि चांदण्यांत क्रमुं या ।
शुभ वेळ आज गमली ॥ २ ॥
राधाहि भक्तियुक्त । शेजेसि रंगनाथ ।
पतिहांक कानिं पडली ॥ ३ ॥

अनयाचि पट्टराणी । विनवीत धावरूनी ।
हो सान चक्रपाणी ॥ ४ ॥
दुडदूड येई सदनीं । हांसून मोक्षदानीं
राधेचि हौस पुरली ॥ ५ ॥
अनयाचा शुद्ध भाव । आणि नित्य वासुदेव ।
मंजूळ बोल बोली ॥ ६ ॥
**शिवकन्या** दीन दासी । नको बांधुं भावपाशीं ।
चरणारविंदिं रमली ॥ ७ ॥

---

मराठी ग्रंथ संग्रहा
स्थळ प्रत
सं. ........ नं. ........
ता. ........
ठाणें.

## २२. बावरी राधा

( चाल- **भावें वरितां गोसेवेला** )

शोधुनि शोधुनि तुजला विपिनीं । श्रमलें हृषिकेशी । कान्हा धांव न कां घेसी ॥ धृ० ॥ पंचप्राण मम अर्पित तुजसी । निष्ठूर कां होसी । रे कान्हा ॥ १ ॥ निशिदिनिं चिंतन करिते देवा । पतिसुत तूं मजसी । रे कान्हा ॥ २ ॥ कुंजवनीं त्या फिरे राधिका । झाली वेडिपिशी । रे कान्हा ॥ ३ ॥ भावभक्ति ती पूर्ण पाहुनी । भेटे राधेसी । रे । कान्हा ॥ ४ ॥ **शिवतनये**चें चित्त हरिपदीं । राहो दिनरजनीं । रे कान्हा ॥ ५ ॥

---

## २३. राधिका

( चाल – डोळे हे जुलमी गडे )

देवकिचा तनय गडे गोकुळिंचा प्राणसखा । प्राप्त जरी होय हरी । काय उणे शांतिसुखा ॥ धृ० ॥ तळमळ किति होय मनीं । दावा गे हरिसि झणिं । पाहिन मी नेत्रीं झणिं । वेळ उगा लाउं नका ॥ १ ॥

---

## २४. गवळण

( चाल – हें मन चंचल मोठें )

कृष्णा मजकडे पाहूं नको तूं । वाईट तुझी ही खोड । अरे कान्हा मजकडे पाहूं नको तूं वाईट तुझी ही खोड ॥ धृ० ॥ जाउनी सांगेन नंदमामाजी । संगत माझी तूं सोड ॥ १ ॥ यमुनाजलासी जाते मुकुंदा । धरुं नको पल्लव सोड ॥ २ ॥ शिवकन्या मागे अन्य नको मज । नामसुधा देई गोड ॥ ३ ॥

---

## २५. भामेचा रुसवा

( चाल – हरहर महादेव बोला )

गोपि तुला प्यारी मजवरि प्रीत न कंसारी ॥ धृ० ॥ गौळण अनयाचीहि राधिका श्यामल सुकुमारी । कंसगृहींची कुब्जादासी आवडते तुज भारी ॥ १ ॥ सत्रजिताची तनया क्रोधें हरिसी झिडकारी । कपटनाटकी यदूनायका बोलुं नको गिरिधारी ॥ २ ॥ यदूनायकासवें

बालिका गोरटि राधा प्यारी । श्यामरंग तूं नंदकिशोरा बोलसिना पुतनारी ॥ ३ ॥ भामा रुसली पाहुनि मोहन मुरली धरी अधरीं । मुरलिरवानें भान हरपलें भामा हास्य करी ॥ ४ ॥ गुणरसपानें मूढ होउनी **शिवात्मजा** भारी । तवपदकमलीं मोहित भ्रमरी तिजला तूं तारीं ॥ ५ ॥

---

## २६. कंसदूत

( चाल - हरहर महादेव बोला )

जासि कुठें कान्हा मजासि सोडुनि मनमोहना ॥ धृ० ॥ कंस-गृहींचा अक्रूर परि तो असे जाणा । कशासि आला नकळे मजला गुप्त तयाचा बाणा ॥ १ ॥ रथध्वनीं हा परिसुनि श्रवणीं गोपि मिळाल्या नाना । निष्ठुर होसी जरि हरि नेसी, ठेवूं नच प्राणा ॥ २ ॥ श्याम रंग तव नंदकिशोरा मोहिसि व्रजललना । गोपि बालिका दीन जाहल्या येवो तुज करुणा ॥ ३ ॥ दहींभात हरि जेवि मुरारी घेई पय पान्हा । तुलसिमाळ ती तिलक केशरी लावूं मी कवणा ॥ ४ ॥ मातुल बघुनी तातजननिसीं सोडवील तव तान्हा । शोक न करिं तूं मज कुरवाळीं देइं आशीर्वचना ॥ ५ ॥ यदूनंदना कंसकंदना करुनी मधुसुदना । झणिं येईं तूं **शिवात्मजा** ही ध्यायी तव चरणां ॥ ६ ॥

---

## २७. यशोदेची हांक

( चाल – **तुझ्या दर्शनें जाहलों धन्य** )

अतां दाखवीं तूं हरी चरणकमलां । योगि ध्याती मनीं शेष शिणला ॥ धृ० ॥ मम पया पाजिलें, पायिं मीं न्हाणिलें । पालखीं निजविलें गाउनियां । रांगसी खेळसी गोपिसीं रमविसी । सान वय मारिसी पूतनेला ॥ १ ॥ अंबराहि पीवळा माळ तुळसी गळां । कस्तुरीचा टिळा रेखिलासी । काठी घे कांबळा गुंजमाळा गळां । वाजवी सांवळा बांसरीला ॥ २ ॥ लाडु पोहे पुरी घे शिदोरी बरी । दूध दहिं भाकरी वाहितोसि । गोरसा चोरिलें गोपिसी फसाविलें । गोधना चारिलें नंदलाला ॥ ३ ॥ त्यजुनियां गोकुळा जासि तूं कोमला । शीण होई मला राजिवा रे । येसि तूं केधवां सांग रे माधवा । सौख्य नाहीं जिवा धेनुपाला ॥ ४ ॥ कंस हा मारिला सोडवी जननिला । जनकही वंदिला सोडवूनी । उद्धवासी हरीं पाठवी गोपुरी । शांतवी झडकरी येश्वदेला ॥ ५ ॥ उद्धवा देखुनी बोलल्या गौळणी । दाखवीं आणुनी कृष्ण कान्हा । गोपिहृदयांतरीं राहसी श्रीहरी । **शिवसुता** उद्धरीं, प्रार्थि तुजला ॥ ६ ॥

---

## २८. मुकुंदाचा धांवा

( चाल – **गज्जल** )

मुकुंदा धांव गोपाळा । विनवितें दीन मी तुजला ॥ धृ० ॥
घाबरा होय जिव आतां । धांव रे धांव यदुनाथा ।
मजवरी रोष कां धरिला । मुकुंदा .... ॥ १ ॥

भवीं या वीट देहाला । येउनी जीव हा शिणला ।
शरण मी जाउं कोणाला । मुकुंदा .... ॥ २ ॥
शांतिचा लाभ ना चित्ता । जाळिते निशिदिनीं चिंता ।
प्राण हा कंठिं मम उरला । मुकुंदा .... ॥ ३ ॥
तप्ततैलीं सुधन्वा बाळ । टाकितां होय शीतळ ।
रक्षिलें वनिं ध्रुवा बाळा । मुकुंदा .... ॥ ४ ॥
तारिली सत्य पांचाळी । संकटीं तूंच वनमाळी ।
**शिवसुता** लीन पदिं अबला । मुकुंदा .... ॥ ५ ॥

...ठी ग्रंथ सं...
...स्थळ प्रत
स. ........ नं. ........
ता. ........
...डा ज.

---

## २९. धेनूचा धांवा

( चाल – **नमन नटवरा** )

धांवत ये कन्हया । विनवि पायां ॥ धृ० ॥ धेनु नाडली धरा पीडीली । त्रस्तचि जनता बहु ही झाली । तुजविण वाली कोणी न उरला ॥ १ ॥ भूभार महा हरण कराया । अवतरलासी तूं प्रभुराया । कलियुगिं निद्रा आली तुजला ॥ २ ॥ पांडवललना दुष्टें छीळली । धांवत आलासी वनमाली । संकटकालीं रक्षिसी तिजला ॥३॥ प्रल्हाद संकटीं स्तंभि प्रगटसी । हिरण्यकश्यपू दैत्य तुं वधिसि । मजवरि निष्ठुर कां झालासी ॥ ४ ॥ क्षणभंगुर तनु धेनु पुजावी । गोसेवाही कधिं न त्यजावी । अंतीं नेई मोक्षपदाला ॥ ५ ॥ गोसेवेची हौस न पुरली । पुरवुन इच्छा ने पदकमलीं । विनवी जोडुनि कर **शिवतनया** ॥६॥

---

## ३०. धेनुमातेचा धांवा

(चाल – बाहुलि आई मजसंगें)

धेनूदैना होइ पहा राजिवनयना । धेनूधांवा ऐकुनि मग वाजिव पांवा ॥ धृ० ॥ क्षीरसागरीं झोंप गोजिरी । कैसी येई तुज कंसारी । धेनुसंकटिं धांव सत्वरीं ॥ १ ॥ गोकुळिं गोपालक तूं बनला । गाइ चारितां कधिं ना श्रमला । कलियुगिं निद्रा आली तुजला ॥ २ ॥ सुरवर मुनिवर धेनु पूजिती । हरिहर ब्रह्मादिक वंदीती । धेनूमाता ही त्रिजगतीं ॥ ३ ॥ भरतखंडिं या गोखिल्लारें । पूर्वीसम हीं दिसतीं कधिं रे । गोभिक्षेचें बंड नको रे ॥ ४ ॥ धेनूपान गृहिंगृहिं व्हावें । गोरस खाउनी बल कमवावें । स्वधर्म रक्षुनि पावन व्हावें ॥ ५ ॥ गोमातेचा करिति अनादर । अंतीं नेती त्या यमकिंकर । यमलोकींचा जाच भयंकर ॥ ६ ॥ धेनूपूजक प्रभुचा प्यारा । यमदंडाचा नच त्या वारा । अंतीं देइल प्रभुपदिं थारा ॥ ७ ॥ तरुण वृद्ध शिशु मृत्यु न पाही । धन सुत वनिता अंतिं न येई । गोप्रभुसेवा करिं लवालाही ॥ ८ ॥ गजेंद्राच्या हांकेसरसीं । गरुड टाकुनी वेगें येसी । मजवरि हरि कां निष्ठुर होसी ॥ ९ ॥ नकळे मजसी गोपदसेवा । कैसि करावी सांग माधवा । **शिवकन्या** पदिं घेइ विसांवा ॥ १० ॥

---

## ३१. डोंबिवलीचा मुरलीधर

( चाल – अजि मीं ब्रह्म पाहिलें )

अजि मीं नयनीं पाहिलें । करिं धरि बांसरि श्याम मुरारी । ऊभे राहिले ॥ धृ० ॥ बालरूप हे कांती सुंदर । सरळ नासिका नयन मनोहर । तिलक केशरी रेखे श्रीवर । भृगुपदा मिरविलें ॥ १ ॥ सव्यवाम त्या धेनु शोभती । शुभ्र सिंहासनीं श्रीपती । किरिट कुंडलें श्रवणिं शोभतीं । नयनां दीपविलें ॥ २ ॥ नील पितांबर कांसे कसिला । तनुवर शोभे हिरवा शेला । कंठीं कौस्तुभ तुलसी-माला । हृदया मोहिलें ॥ ३ ॥ डोंबिवलीचा कृष्ण मुरारी । धेनूवत्सें बहु त्या प्यारीं । द्वापारींचा जणुं कंसारी । ऐसें भासलें ॥ ४ ॥ अनुपम शोभा दिसते वनिं या । नमन करोनी गौरीसुता या । वृंदावनिं प्रिय हरिची जाया । हनुमंता पूजिलें ॥ ५ ॥ गुप्त गंगा म्हणति जियेला । लतामंडपीं अत्रिसुताला । नमन करोनी श्रीअंबेला । भावें वंदिलें ॥ ६ ॥ दीपस्तंभ आणि रुग्णालय तें । पाहुनि आले पांथ-गृहातें । **शिवतनये**चें मन गुंगवितें । प्रभुपदां वंदिलें ॥ ७ ॥

---

## ३२. फुलबाग

( चाल झिम्मा खेळूं ये ग )

चल जाऊं ये ग पुष्पें तोडूं ये । बागेमध्यें आनंदानें हसूं खेळूं ये ॥ धृ० ॥ बंगला असे टुमदार । मध्यभागीं तो सुंदर । रस्ते दिसती चहूंफेर । वाळूमय हे ॥ १ ॥ गारवेल कैसा दीसे । गजसोंडेसम भासे । झोला तेथें झूलतसे । वर बसूं ये ॥ २ ॥ चहूंबाजू त्या

कमानी । हरि प्रिया वृंदावनीं । कृष्ण कमळें प्रभूचरणीं । चल वाहूं ये ॥ ३ ॥ सोनचांफा ती मालती । शुभ्र पिंवळी शेवंती । जाई जुई फुलें किती । गजरे गुंफू ये ॥ ४ ॥ गुलाब तो राजेश्वर । मोगराही तो सुंदर । वास येई तो मधूर । खुलें मन हें ॥ ५ ॥ सुपारीची कृश फुलें । वातस्पर्शें नृत्य चाले । अब्दागीरीसम डोले । सूर्यफूल हें ॥६॥ आबूली ती बहु लहान । तगरी दीसे गोरी पान । तिरसंगी ती लपे जाण । चल शोधूं ये ॥ ७ ॥ कर्दळीला आला भर । चला पाहूं या कण्हेर । मखमाली झेंडू थोर । पीक बहू ये ॥ ८ ॥ पटाकृती रस्ते चार । नयनां दीसे मनोहर । लाललाल हो सुंदर । किती खुलती हे ॥ ९ ॥ दवणा मरवा तोडूं मेंदी । बिल्व अगस्तासी वंदी । दुर्वांची ती बहू गर्दी । लक्ष वाहूं ये ॥ १० ॥ पारिजात सुकूमार । श्रावणमासीं येई बहर । फुलें वेचूं दुरडीभर । लक्ष मोजूं ये ॥ ११ ॥ लिली सायली चमेली । गोकर्णीच्या लतावेली । तेरड्यांची गर्दी झाली । रंग पाहूं ये ॥१२॥ कोरांटीही सुकूमार । रातराणी मनोहर । गुलबाक्षीचें रंग फार । हार गुंफूं ये ॥ १३ ॥ कुंदकळी नेवाळीचें । हळूवार बकुळीचें । पीत पुष्प सुरंगीचें । पाचू खुडूं ये ॥ १४ ॥ आंवळी आंबा चिंच किती । पपई पेरू केळी लवती । डाळिंब सीताफळें किती । चल तोडूं ये ॥१५॥ कारंजाचें हे तुषार । थैं थैं उडती मनोहर । शीतळ छाया तृणांकूर । मध्यें बसूं ये ॥ १६ ॥ राघू मैना मयूर नाचे । गोड गान कोकीळेचें । रम्य रातीं चांदण्याचें । स्थल दिसे हें ॥ १७ ॥ कवितारूपी पुष्पमाला । प्रेमें गुंफी **शिवबाला** । हौसी राम बंधू आला । त्यासी अर्पूं ये ॥ १८ ॥

---

## ३३. उंदिरमामाची गम्मत

( चाल - शेतकऱ्याची ती यमनी )

उंदिरमामा हा आला । आटोपुनियां स्नानाला ।
करीं आरसा घेउनियां । तोंड पाहतो वांकुनियां ।
भांग काढितो मग जपुनी । केंस फणीनें विंचरुनी ।
शेंपुट डोकें अणि कान । लुटु लुटु हलवीतो मान ।
खमंग आला ।
वास तयाला ।
धांवत सुटला ।
परी पाहतां त्या मनिला । उंदिरमामा घाबरला ॥ १ ॥

---

## ३४. कांकड आरती

( चाल - त्यजि भक्तासाठीं )

गुरुराज दीन जनपाला । करुं तुम्हांसि कांकड आरती ॥ धृ० ॥ अविद्येचा कांकडा केला, अनुसंधान स्नेहें भिजविला, पाहिली गुरुची मूर्ती ॥ १ ॥ घालुनी पंचामृत स्नान, लोणी साखर करूं अर्पण, भक्तजनाहि तुजसी स्तविती ॥ २ ॥ चुट्चुट् खडावा वाजें, करिं दंडकमंडलु साजे, पांघरे गुलाबी छाटी ॥ ३ ॥ भस्मभूषण शोभे तनुला, कंठिं रुद्राक्षाची माला, चिद्घन जयातें म्हणती ॥ ४ ॥ गुरु-नामें घेइं तूं वाचे, क्षालन हें करि पापाचें, रामकृष्ण गुरु ते स्मरती ॥ ५ ॥ गंगातिरीं वास तव केला, नमितसे **शिवबाला**, मतिमंद देइं मज स्फूर्ती ॥ ६ ॥

---

## ३५. गणपतीची आरती

जयदेव जयदेव जय पार्वतीतनया जय गौरीतनया। ओंवाळीते तुजसी षड्रिपु ने विलया ॥धृ०॥ शेंदुर चर्चुनि तनुसी दिससी सुंदर। मोदक भक्षुनि झालें विशाल हें उदर। उंदीर वाहन, उदरा वेष्टित फणिवर ॥ १ ॥ किरीट कुंडल शोभे, कटिं पीतांबर। वांकी तोडर चरणीं घागरिया गजर। कंठीं मौक्तिकमाला, शुंडाही सरळ। विधि-दुहिता वामांकीं शोभे शिवकुमर ॥ २ ॥ कस्तुरितिलका रेखुनि भावें पूजियलें। लाडू मोदक नैवेद्यासीं अर्पियले। सुवर्णताटीं कर्पुर दीपहि लावियले। केतकि दुर्वांकूर प्रेमें वाहियले ॥ ३ ॥ हरिहर ब्रह्मादिक ध्याती मानसीं। नेतीं नेती शब्दें मौन पडे श्रुतिसी। नकळे रूप तुझें निगमा-आगमासी। मंगलमूर्ती स्मरतां मंगल तूं करिसी ॥ ४ ॥ रत्नजडीत मुकुट शोभें शिरकमलीं। शत्रूनाशक परशू शोभे करकमलीं। कोटी रवि-शशिंची शोभा मुखकमलीं। **शिवतनया** विश्रांती इच्छी पदकमलीं ॥ ५ ॥

---

## ३६. बोडणाची आरती

(चाल-**कुंडिनपुरिं सिंहासनिं**)

जय जय जय सिंधुसुते नमन हें तुला। पाप ताप दैन्य हरुनि अभय दे मला ॥ धृ० ॥ पंचामृत घेउनि करीं भावें पूजिलें। जाइजूई बकुलहार गजरे वाहिले। दिव्यान्नें पूर्णपोळी आवडे तुला॥ १ ॥ बोडण हें गृहिं भरतां हेतु पुरविसी। भक्तांगीं संचरुनी भविष्य बोलसी। तारीं श्रीजगदंबे दीन जनाला ॥ २ ॥ पंचारति करुनि आधीं पंचविषय ते। अर्पुनियां चरणिं तुझ्या ठाव मागतें। **शिवकन्या** सेवि नित्य नामसुधेला ॥ ३ ॥

---

## ३७. जिवतीची आरती

( चाल–**आरती मंगळागौरी** )

आरती जिवतीमाते, रक्षीं माझ्या बाळातें भक्तीभावें पूजितें ॥धृ०॥ श्रावणमासीं शुक्रवारीं पूजन जिवतीचें गृहाभितरीं दुर्वा आघाडा घेउनी करी, वाहती त्या देवतेसी, वस्त्रें पुष्पहारासी ॥ १ ॥ प्रिय पूरणपोळी तुजला भारी, गृहीं जेविती सुवासिनी नारी, पंचआरती घेउनी करीं, पाटीं बैसवी ती, बालका ओंवाळीती ॥ २ ॥ हळदि कुंकु स्त्रियांना देती, दूध फुटाणें बहू वांटिती तान्हुल्याकारणें व्रत हें घेती, सुखी ठेवीं तूं त्यातें, **शिवकन्या** विनविते ॥ ३ ॥

---

## ३८. हरितालिकेची आरती

( चाल–**चला सख्यानों** )

जय जय जय जय जय गिरिबाले ओंवाळित तुजला । अखंड देई सौभाग्यातें विनती पदकमलां ॥ धृ० ॥ भाद्रपदमासीं शुद्ध तृतीया सोमवारयुक्त । हस्तनक्षत्रीं शिवगौरीसी भावें पूजित ॥ १ ॥ वालुकामयें लिंग करोनी मंडपिं स्थापियलें । गंगातीरीं सखि गौरीनें भावें त्या पुजिलें ॥ २ ॥ पंचामृतिं तें पूजन करुनी तांबुल अर्पियले । वस्त्रभूषणें वायन देउनि कुंकुम वाहियलें ॥ ३ ॥ जाग्रण करुनी उपोषणातें प्रभातिं सोडियलें । वर देवोनी नीलकंठ मग कैलासीं गेले ॥ ४ ॥ हिमवंतानें वनीं शोधुनी दुर्गा गृहिं आणिली । 'शिवा अर्पिलें तुज' या शब्दें अंबा तोषविली ॥ ५ ॥



मराठी ग्रंथ संग्रहालय

धूर्जटिसी मग हिमवंतानें निजकन्या दिधली । हरितालिकाव्रत आच-
रितां शिवचरणीं रमली ॥ ६ ॥ पाप ताप मम दैन्य हरोनी मोक्ष
पदीं न्यावें । **शिवतनया** भवसागरिं बुडते तारक तूं व्हावें ॥ ७ ॥

---

## ३९. कामधेनुची आरती

जयदेव जयदेव जय धेनुमाते जय सुरभीमाते । अर्चन पूजन करितां हरिसी पापांतें ॥ धृ० ॥ अमृतसागर तूझ्या दुग्धस्थलिं वसती । हरिहर ब्रह्मादीक हृदयीं नांदती । अश्विनकुमार कर्णीं, षण्मुख गणपती । नेत्रांमाजी रवि-शशि अखंड वसताती ॥ १ ॥ कृतांत, शचिवर, शृंगीं सन्मुख कपिवर । नवग्रह, वसिष्ठ, पृथ्वी, चरणीं गिरिचर । पुच्छामाजीं फणिवर, विधिजा सुंदर, । गुप्तस्थानीं गंगा नारद तुंबर ॥ २ ॥ वसिष्ठ सदनीं नसतां हरुनी तुज नेलें । अगणित अविंध निर्मुनि निजबल दावियलें । कौशिक सैन्या वधुनी वसिष्ठ मग नमिले । नंदिनि कामधेनु, सुरभी तुज पुजिलें ॥ ३ ॥ परोपकारीं तुजसम जगतीं नच कोणी । निज तनु झिजवुनि आम्हां पाजिसि पय जननी । उपमा साजे तुला कमलेची भगिनी । **शिवतनया** मानसिं तुज चिंतित दिन-रजनी ॥ ४ ॥

---

## ४०. सद्गुरूची आरती

जयदेव जयदेव जय सद्गुरुनाथा, जय श्रीगुरुनाथा । आरती ओंवा-ळीतां हरली भवचिंता ॥ धृ० ॥ भस्मभूषण तनुसी चरण सुकुमार ।

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
४३७७

हास्यवदन प्रभुचें कंठीं पुष्पहार । जपमाळा हातीं छाटी सुंदर । चरणीं खडावा त्या गमे अत्रीकुमर ॥ १ ॥ हातीं दंड धरुनी दुष्टा दंडीसी, अधर्म खंडीसी । शुद्धी-संघटनेनें पतिता उद्धरिसी । सद्गुरु-कृपेनें जगद्वंद्य होसी । महाभागवत नामातें धरिसी ॥ २ ॥ कुर्त-कोटी जन्म गंगातिरिं वास, गोदातिरिं वास । जगमान्य असुनी राहसि उदास । भगवद्गीतामृता देसी सर्वांस । सान थोर धांवुनि येती श्रवणास ॥ ३ ॥ काळ घिरट्या घाली निद्रा ये मजसी । देउनि उपदेशातें जागृत केलेंसी । अखंड तूझें नाम जपतां मानसीं । जन्म-मृत्यु-भय जाई विलयासी ॥ ४ ॥ पंचहि प्राणांची पंचारति केली । अहं कर्पूराची ज्योत उजळीली । ज्ञानवैराग्याची शर्करा आणिली । सद्भावें सद्गुरुसी अर्पण केली ॥ ५ ॥ शिणलें संसारीं, परमार्थी फसलें । चौऱ्यांशीचा फेरा फिरुनी मी श्रमलें । तव कीर्ती ऐकुनियां शरण तुज आलें । **शिवतनया** विनवितें दावीं पदकमलें ॥ ६ ॥

---

## ४१. निरोप

(वृत्त – **राजहंस**)

हितकर तें कथितें तुजला । हो विजयी राजस बाळा ॥धृ०॥

परदेशीं गमन करावें । मातृभूस हृदयिं धरावें ।
सत्य, शील, रक्षण करुनी । बल आत्मिक संगें घ्यावें ।
पाळुनी ब्रह्मचर्यातें । शरिरानें सुदृढ व्हावें ।

विद्येचें भूषण सत्य
संपादुनि येइल त्वरित
धवलही कीर्ति राष्ट्रांत

आशीर्वच मम हें तुजला । हो विजयी राजस बाळा ॥ १ ॥

मागसी निरोपा प्रेमें । मानुनी पितृभगिनीस ।
सर्वदा राहिं नेमस्त । भूलुं नको बाह्य सृष्टीस ।
तूं सुज्ञ, नको बहु लिहिणें । परि प्रेम बोलतें सत्य ।

मम बोध मनीं दृढ धरिसी
निष्कलंक सदना येसी
रक्षील श्रीहरी तुजसीं

**शिवसुता** इच्छिते तुजला । हो विजयी राजस बाळा ॥ २ ॥

---

## ४२. आशीर्वाद

(वृत्त - अक्रूर)

तुज लिहिते हें आशीर्वच तव आई । प्रिय कन्ये चंपूताई ॥धृ०॥

संसारीं तनु मम झिजली
तीर्थदर्शनें नच घडली
ही संधी चालुन आली

मग दवडुं कशी अडचण म्हणुनी बाई । प्रिय....॥ १ ॥

प्रसुतची होसि सुखरूप
काळजी नसावी अल्प
राम गजाननासी जप
नको रागावूं त्यासी तूं गे बाई । प्रिय....॥ २ ॥
तव सदनिं उणें नच कांहीं
निज तनुसी जपुनी राहीं
गर्भिणी तूं सात्विक खाईं
चिंताच नको जपतिल आत्याबाई । प्रिय....॥ ३ ॥
बाविस दश बत्तिसला
येउनि मी भेटिन तुजला
नच धरीं मनीं चिंतेला
हें पुनरपि मी लिहितें तुजला बाई । प्रिय....॥ ४ ॥

---

## ४३. गोविंदाचा छंद (श्लोक)

गोविंद गोविंद मन घेइ छंद
गोविंद म्हणतां तुटे भवबंध
गोविंद राहे भिमेच्या तटाकीं
गोविंद माझा तिथें धेनु राखी ॥ १ ॥
गोविंद धेनू फिरे वाळवंटीं
न लागो तयासीं जनांचीहि दृष्टी
गोविंद माझा असे बालमूर्ती
जनांना परी तो दिसे भव्यमूर्ती ॥ २ ॥

गोविंद तारी भवसागरीं या
गोविंद नेई लया सर्व माया
गोविंद राहो ह्रदयीं सदा या
विनवीतसें मी रघुराजराया ॥ ३ ॥

---

## ४४. सांजवात

### ओंव्या

दीप देवघरीं । लावावे मंदीरीं । न जावें बाहेरी । सांजवेळीं ॥ १ ॥
नमूं माता पिता । नमूं देवराया । नमुं हरिप्रिया । तुळशीला ॥ २ ॥
तुळशीचे वाफे । लावावे ते दारीं । जल शिंपा वरी । नित्यप्रेमें ॥ ३ ॥
तुळशीचें बन । दिसे मनोहर । हवाही सुंदर । होय तेणें ॥ ४ ॥
तुळशी सन्निध । असे वनमाळी । प्रिय ही सांवळी । विष्णुलागीं ॥ ५ ॥
रवि कामधेनू । नमा सांजवेळीं । लक्ष्मुमी जवळी । सदा राही ॥ ६ ॥
मातानों आपुलीं । बाळें विद्यावंत । करा बोधामृत पाजोनियां ॥ ७ ॥
क्रोध सोडूनियां । मन करा शांत । विनंती करीत **शिवकन्या** ॥ ८ ॥

---

## ४५. सूर्योदय

( चाल - **आनंदाचा कंद** )

चला उठूं या, रात्र संपुनी सूर्य उदय होतसे ।
किलबिल करुनी पक्षी गाती, वेळ मनाला सुखवितसे ॥धृ०॥
मंद गंधवह प्रभातवायू तरुशिखरांना डोलवी ।
बागेमध्यें गुलाब फुलला मधमाशी ही सांगतसे ॥ १ ॥

गाई म्हशिही गेल्या राना बैल चालले शेताला ।
कामें करितां आळस सगळा देह सोडुनी जातसे ॥ २ ॥
चला बसूं या अभ्यासाला भानुकिरण हे सांगती ।
सूर्यदेव हा नमितां प्रेमें, विद्या सहजचि येतसे ॥ ३ ॥

## ४६. प्रणाम

प्रभुवर प्रणाम घ्यावा । देवा ॥ धृ० ॥
बन्सीवाला तूं जगपाला । तारक तूं सकलासीं । देवा ॥
दीन जनाचा वाली साचा । मानुनि घ्यावी सेवा । देवा ॥
आस मनीं ही खास लागली । वास पदीं मी मागें । देवा ॥
भावभक्तिचा सुंदर मेवा । **शिवकन्येला** देई । देवा ॥

* * *

निर्गुण लावण्य प्रीय न कोणासी ?।
गुणी मानवासी मान जगीं ॥ १ ॥

* * *

## ४७. स्फुट भजनें

यदुकुल भूषण हरि कान्हा ।
गाति सदा त्या व्रजललना ॥

* * *

राधाधर श्री रुक्मिणी ।
संत गाति ते दिन-रजनी ॥

* * *

रमामाधवा उमामाधवा ।
हर हर शंकर सदाशिवा ॥

मराठी ग्रंथ सं
स्थळ प्रत
क्र.
ता.

# ‘स्मृति’ – पुरवणी.

( श्री. मे. ग. साठे कृत पदें )

## १. स्वागत

( चाल – **प्रणति पदिं तव जय** )

स्वागत हें करी ही अजि बाला । प्रणति करुनियां सुजन-पदांला ॥ धृ० ॥ जनगणपद जरि प्रथम वंदिला । सहज सुयश स्वीकृत कार्याला ॥ १ ॥

---

## २. तळमळ

( चाल – **असे पति देवाचि** )

कुठवरी अंत हा वाया । पाहसी सांग यदुराया ॥ धृ० ॥
कुणाचें कोण या जगतीं । पसारा हा स्वार्थासाठीं ।
समजुनि उमजलें सारें । प्रभूचे खेळ हे सारे ॥ १ ॥
तरीही गुंतुनी पडतों । स्वत्व मी विसरुनी जातों ।
प्रभूचा माया मोह पुन्हां । भासवी मी असें काया ॥ २ ॥
सुखें मी खेळतों हंसतों । मनासी पूर्ण रिझवीतों
तळमळे आंतुनी जिव हा । कळेना काय होइ तया ॥ ३ ॥
शांतता ना जिवा वाटे । शांतवाया न कुणी भेटे ।
कल्पना गांजिते चित्ता । जाउ ना देइ क्षण वायां ॥ ४ ॥
सुवेळीं औषधा देई । श्रीहरी वैद्य लवलाही ।
शिरावरिं हस्त ठेवुनियां । दुर्लभा शांति दे सदया ॥ ५ ॥
संपुनी आयु जाईल । फुकट मम जन्म होईल
निशि-दिनीं भीति ही स्वमनीं । म्हणोनी शरण तव पायां ॥ ६ ॥

---

## ३. मैत्रिणीचे डोहाळे

( चाल – **कमलनयन हरि तारक** )

सुखद सुदिन तुज अजि जरि गमला। पुसत वदसि तरि सुख मग सकलां ॥ धृ० ॥ दोहद नव नव पुरवायाला । आप्तगण असे तत्पर झाला । इच्छित सांगुनि सुखवीं सकलां ॥ १ ॥ शशिकर-धवल असे अजि रजनी। रुचत विहार मनीं वद कथुनी। आणितिल तुजसी नव सुममाला ॥ २ ॥ तरुशाखेप्रति बांधुनि झोला । खेळुं सख्यांसह मग त्या काला। धवल सुधाकर प्रिय बहु तुजला ॥ ३ ॥ सांगु आणाया सुमधुर सुफलें। पक्वान्नें करुं जरि तुज रुचलें। ठरवुं सखे भोजनवेळा ॥ ४ ॥ मुदिता तूं मग मोद अम्हांला ! मोद गमें अजि भुवनीं भरला। तूं सुखि मग सुख उदरीं बाला ॥ ५ ॥ बाल हरीची मोहक मूर्ती। स्तवितां होइल इच्छितपूर्ती। संतत परिस तयाची लीला ॥ ६ ॥ तो रघुवीर मनीं स्तव स्मरुनी। प्रार्थित जाई तयास विलोकुनी । प्रभु तव गुणयुतसुत दे मजला ॥ ७ ॥ सतत प्रसन्न असो तव मन गे। क्रोधादिक दे सोडुनि अवघे। जगतीं आनंदचि मग उरला ॥ ८ ॥ मोहक बघतां मोहक होती। बाळे ऐसी जगतीं ख्याती। बालक मोहक होइल तुजला ॥ ९ ॥ नऊ मास नव दिन हे जातां। सहजचि होशिल सखये माता। दिसतिल पुढती बालकलीला ॥ १० ॥

---

## ४. विहिणींना विनंति

( चाल - **सुखद सुदिन** - राग भूप )

कमलनयन हरि तारक वधुला । तरिहि करितसे विनति तुम्हांला ॥ धृ० ॥ प्रेम बहू मति मन मोहवि सकलां । तें शिकवितसे या विनतीला । कोप न यावा म्हणुनि मनाला ॥ १ ॥ प्रेमभरें सुखी ठेवुनि तिजला । ध्या पदरीं ही सुशीला सरला । सौख्यद मंगल होइल सकलां ॥ २ ॥

---

## ५. डोहाळे कौसल्येचे

( चाल - **भास मला जाहला** )

चाप बाण द्या मला रावणा वधाया । हरुनि नेत जानकी कपटि धरुनि माया । लक्ष्मण, कपिसेनेसह, लढुनि सोडवित रामजाया ॥धृ०॥ दशरथनृप पुसत जईं ज्येष्ठ राज्ञि वदत तईं, नयन गोल फिरवि गोल कांपतसे थर थर तिची काया ॥ १ ॥ गुरुसि नमुनि नृपति वदत राज्ञि-अंगिं वायु होत गुरुजि चला धिर न मला येऊनि त्वरिं अभय करा काया ॥ २ ॥ वसिष्ठ तइं करि समजुत, घेत जन्म जगत जनक तव रघुकुल होत सफल, **श्याम** असे नमित रामपाया ॥ ३ ॥

---

## ६. हांसरी राधिका

( चाल - **रुसलासी हरी कां बरें-** )

रुसली ही अशी राधिका । धरि बळें अबोला फुका ॥ धृ० ॥
गान गाई मधू बांसरी । होइ राधा झणीं हांसरी ।
**श्याम** पाहे स्मितें तन्मुखा ॥ १ ॥

समाप्त

५५५१.

REFBK-0005371
REFBK-0005371